कायदेविषयक मार्गदर्शन मोफत
संपर्क
ॲड . सिद्धार्थ
MVsc, MBA, LLM
मो नं ९४२२५३९४५१

RNI NO. MAHMAR/2020/84035
BAHUJAN SAURABHA
# बहुजन सौरभ
गुरूवार, ३० एप्रिल २०२६
Thursday, 30 April 2026
वर्ष : ६ | अंक : १२१
Year : 6 | Issue : 121
दैनिक | किंमत : ₹५/-
Daily | Rate: Rs. 5/-

**दि. ३० एप्रिल 2026**



1927- मुंबई कामाठीपुरा येथे म्युनिसिपल शाळेतील मुलांच्या बक्षिस समारंभात महाड प्रकरणावर परिसंवाद संपन्न.

संकलन प्रा. यशवंत दुपटे

## महत्त्वाच्या बातम्या

### अशोक खरातला 12 मे पर्यंत न्यायालयीन कोठडी

**नाशिक :** नाशिकमधील एका फसव्या बाबाची काळी कृत्ये सातत्याने उघडकीस येत आहेत. स्वतःला देवाचा दूत आणि ज्योतिषी म्हणवणारा अशोक खरात अनेक गंभीर आरोपांना सामोरा जात आहे. महिलांच्या असहायतेचा आणि दुःखाचा गैरफायदा घेऊन व्यभिचार करणाऱ्या या बाबाला आता न्यायालयाकडून मोठा धक्का बसला आहे. त्याच्याविरुद्धचा पोलीस तपास अधिक तीव्र झाला असून, आता त्याला तुरुंगवासाची शिक्षा होण्याची शक्यता आहे. फसवणूक करणाऱ्या बाबा अशोक खरातची काळी कृत्ये हळूहळू उघडकीस येत आहेत. नाशिक न्यायालयाने त्याच्या सातव्या लैंगिक शोषण प्रकरणात त्याला 12 मे पर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. दैवी शक्ती आणि काळी जादू असल्याचा दावा करून अनेक महिलांचे लैंगिक शोषण आणि फसवणूक केल्याचे गंभीर आरोप खरातवर आहेत.

### सर्वोच्च न्यायालयाने तीस्ता सेटलवाड यांची पासपोर्ट प्रकरणी याचिका फेटाळली ...

**नवी दिल्ली :** सर्वोच्च न्यायालयाने बुधवारी सामाजिक कार्यकर्त्या तीस्ता सेटलवाड यांनी आपला पासपोर्ट परत मिळवण्यासाठी दाखल केलेली याचिका फेटाळून लावली. न्यायालयाने म्हटले आहे की, परदेश प्रवासाची योजना निश्चित झाल्यावर त्या नवीन याचिका दाखल करू शकतील. सध्या त्यांना त्यांचा पासपोर्ट दिला जाणार नाही. तीस्ता सेटलवाड यांचा पासपोर्ट सध्या कनिष्ठ न्यायालयाच्या ताब्यात आहे.

हे प्रकरण न्या. दिपांकर दत्ता, सतीशचंद्र शर्मा आणि आलोक आराधे यांच्या खंडपीठासमोर सुनावणीसाठी आले. सुनावणीदरम्यान ज्येष्ठ वकील कपिल सिबल यांनी तीस्ताच्या वतीने बाजू मांडली. न्यायालयाने पुढे म्हटले, 'तुम्हाला कोणत्या देशात प्रवास करायचा आहे, हे तुम्ही आम्हाला सांगितले पाहिजे. परदेशात प्रवास करण्यासाठी तुम्हाला तुमचा पासपोर्ट परत हवा असल्यास, त्यासाठी तुम्हाला एक ठोस आधार आणि प्रकरण सादर करावे लागेल.'

### धीरेंद्र शास्त्रींचे श्याम मानव यांना थेट आव्हान

30 तारखेला निघून जाईन, मग म्हणू नका बाबा पळून गेला : धीरेंद्र कृष्ण शास्त्री

**नागपूर :** बागेश्वर धामचे धीरेंद्र कृष्ण शास्त्री आणि अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे श्याम मानव यांच्यातील वाद आता शिगेला पोहोचला आहे. नागपुरातील रेशीमबाग मैदानावर सुरू असलेल्या रामकथेदरम्यान धीरेंद्र शास्त्री यांनी श्याम मानव यांचे आव्हान स्वीकारत त्यांना प्रत्यूत्तर दिले आहे. 'कुणाला काही ... असेल तर त्यांनी समोर यावे,' अशा कडक शब्दांत शास्त्रींनी प्रतिआव्हान दिले असून याचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे. शास्त्रींनी श्याम मानव यांना टोला लगावताना म्हटले की, 'दोन दिवस माझा दरबार भरणार आहे. ज्यांना शंका आहे त्यांनी यावे, जेणेकरून त्यांची आणि आमची झंझट कायमची संपेल. मी 30 तारखेला इथून निघून जाणार आहे, त्यानंतर मी पळून गेलो असा आरोप करू नका.

# पश्चिम बंगाल निवडणुकीत मोठा राडा

ईव्हीएमवरील भाजपच्या बटणावर 'टेप'!

मतदान थांबले,

आयोगाकडून फेरमतदानाचे संकेत



**कोलकाता :** पश्चिम बंगालमध्ये विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्याचे मतदान सुरू आहे. यातच, डायमंड हार्बर लोकसभा मतदारसंघातील फाल्टा भागात मोठा राडा झाला आहे. येथे ईव्हीएम मशीनवरील भाजपच्या पर्यायासमोर टेप लावण्यात आल्याची तक्रार भाजपने केला आहे. भाजपकडून करण्यात आलेल्या या गंभीर तक्रारीची दखल घेत, निवडणूक आयोगही ॲक्शन मोडवर आला असून, 'ज्या पोलिंग बूथवर, ईव्हीएमच्या बटणावर टेप आढळून येईल, तेथे फेरमतदान घेतले जाईल, असे पश्चिम बंगालचे मुख्य निवडणूक अधिकारी मनोज अग्रवाल यांनी स्पष्ट केले आहे. या वादानंतर अनेक केंद्रांवरील मतदान तात्पुरते थांबवण्यात आले होते. यासंदर्भात, भाजपचे सह-प्रभारी अमित मालवीय यांनी 'एक्स'वर एक व्हिडिओ शेअर करत या प्रकाराला 'डायमंड हार्बर मॉडेल', असे म्हटले आहे. ते म्हणाले, विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यात, डायमंड हार्बर विधानसभा मतदारसंघांतर्गत येणाऱ्या फाल्टा येथील अनेक मतदान केंद्रांवर मतदारांना पक्षाचा उमेदवार निवडण्यापासून रोखले जात आहे. अनेक मतदान केंद्रांवर भाजपचा पर्याय टेपने झाकण्यात आला होते. एवढेच नाही तर, 'हे तथाकथित 'डायमंड हार्बर मॉडेल' आहे, याच पद्धतीमुळे ममता बॅनर्जी यांचे भाचे, अभिषेक बॅनर्जी यांना त्यांची लोकसभा सीट वाचवण्यात मदत झाली,' असेहीम मालवीय यांनी म्हटले आहे. दरम्यान, तृणमूल काँग्रेसने भाजपच्या चिन्हावर टेप लावल्याचा दावा फेटाळून लावला असून, पराभव समोर दिसत असल्याने भाजप विनाकारण गोंधळ घालत असल्याचे म्हटले आहे. फाल्टा मतदारसंघात भाजपने, तृणमूल काँग्रेसच्या पन्ना लाल हलदर यांच्या विरोधात दीपक कुमार हलदर यांना मैदानात उतरवले आहे. आज पश्चिम बंगालमधील 142 जागांसाठी दुसऱ्या टप्प्यातील मतदान सुरू आहे.

> दुसऱ्या टप्प्यात, दुपारी 1 वाजेपर्यंत 3.21 कोटी मतदारांपैकी 60 टक्क्यांहून अधिक मतदारांनी मतदान केले, मात्र काही ठिकाणी तुरळक हिंसाचार आणि उमेदवारांवर हल्ल्याच्या घटनाही घडल्याचे वृत्त आहे. पहिल्या टप्प्यात पश्चिम बंगालने देशाला दाखवून दिले की 93 टक्के मतदान शक्य आहे आणि निवडणुका मुक्त व निष्पक्षपणे घेतल्या जाऊ शकतात. या टप्प्यातही हाच आकडा गाठणे किंवा ओलांडणे हे आमचे ध्येय आहे.
>
> **- मनोज कुमार अग्रवाल**

### आयोग सत्ताधारी पक्षाला मदत व्हावी म्हणून करतोय दहशतवादाचा अवलंब :



**पुणे :** 'पश्चिम बंगालसारख्या राज्यात ममता बॅनर्जी यांच्यासारखे खंबीर नेतृत्व असताना त्यांच्या पराभवासाठी अडीच लाख पॅरा मिलिट्री फोर्स पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी पश्चिम बंगालमध्ये नेऊन ठेवली आहे. साम, दाम, दंड, भेद याचा वापर होतोय. हा प्रशासकीय, निवडणूक आयोगाचा दहशतवाद असून, ही अत्यंत गंभीर गोष्ट देशाच्या लोकशाहीत घडतेय. निवडणूक आयोग सत्ताधारी पक्षाला मदत व्हावी म्हणून दहशतवादाचा अवलंब करतोय', असा आरोप उद्धवसेनेचे नेते आणि खासदार संजय राऊत यांनी पत्रकार परिषदेत केला.'पुण्यात, पिंपरी-चिंचवडला काय झाले, याच पद्धतीने निवडणुका लढण्यात आल्या. कोणत्या परिस्थितीत महाराष्ट्रात निवडणुका झाल्या आणि होतायत हे मी तुम्हाला सांगायला नको. आम्ही लढणारे लोक आहोत', असे संजय राऊत म्हणाले. 'एन्काऊंटर स्पेशलिस्टवर निवडणुका जिंकण्याची गरज नरेंद्र मोदींसारख्या लोकप्रिय नेत्याला का भासावी ?, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे जगाचे नेते आहेत. अंतराळात राजकारण सुरु झाले तर ते तिथले नेते होतील. जोडीला अमित शाह आहेतच. तरीही त्यांना पोलिस फोर्स नेऊन लोकांना धमक्या देऊन निवडणुका जिंकण्याची वेळ येत आहे. याचाच अर्थ त्यांना पराभव दिसतोय. पराभवाचे रूपांतर विजयात करण्यासाठी त्यांना असे उपद्व्याप करावे लागत आहेत', अशी बोचरी टीका राऊत यांनी केली.

# बाबासाहेबांनी ध्वनी प्रदूषणाचे कधीच समर्थन केले नसते ... : हायकोर्ट

*'बाबासाहेबांची जयंती केवळ त्यांच्या जीवनाचा उत्सव नसून त्यांच्या विचारसंपत्तीला आणि समाजसुधारणेच्या कार्याला आदरांजली आहे. त्यांची जयंती साजरी करणे म्हणजे केवळ त्यांच्या शब्दांची आठवण नव्हे, तर त्यांच्या समता, न्याय आणि प्रगतीच्या दृष्टिकोनाचा सन्मान करणे आहे.'*

**नागपूर :** गेल्या 14 एप्रिल रोजी संविधान चौक येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीचा कार्यक्रम आयोजित करणाऱ्यांनी प्रचंड ध्वनी प्रदूषण केले. त्यामुळे मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने मंगळवारी आयोजकांसह समाजाला बाबासाहेबांचे विचार व तत्वज्ञानाची जाणिव करून दिली. बाबासाहेबांची जयंती केवळ त्यांच्या जीवनाचा उत्सव नसून त्यांच्या विचारसंपत्तीला आणि समाजसुधारणेच्या कार्याला आदरांजली आहे. त्यांची जयंती साजरी करणे म्हणजे केवळ त्यांच्या शब्दांची आठवण नव्हे, तर त्यांच्या समता, न्याय आणि प्रगतीच्या दृष्टिकोनाचा सन्मान करणे आहे. त्यांचे जीवन, तत्त्वज्ञान आणि लेखनाचा विचार केल्यास त्यांनी बौद्धिक प्रगती, सामाजिक सुधारणा आणि सक्षमीकरणावर भर देणारा जयंती उत्सव पसंत केला असता. वंचितांचे उन्नयन, महिला सक्षमीकरण आणि जातीय भेदभाव निर्मूलनावर भर दिला असता. परंतु, त्यांनी ध्वनी प्रदूषणाचे कधीच समर्थन केले नसते, असे न्यायालय म्हणाले. शहरातील ध्वनी प्रदूषणासंदर्भात उच्च न्यायालयात चार याचिका प्रलंबित आहेत. त्यावर न्या. उर्मिला जोशी-फलके व निवेदिता मेहता यांच्यापुढे सुनावणी झाली. दरम्यान, न्यायालयमित्र ॲड. अब्दुल सुभान यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त संविधान चौक येथे आयोजित करण्यात आलेल्या विविध उपक्रमांमधील मोठा आवाज, घोषणाबाजी आणि फटाके फोडणे यामुळे ध्वनी प्रदूषण नियंत्रण नियमांचे उल्लंघन झाल्याची माहिती दिली. न्यायालयाने ही बाब गंभिरतेने घेऊन बाबासाहेबांच्या विचारांसह संविधानाचे तत्व व कायद्याचे महत्व स्पष्ट केले.



बाबासाहेब संविधानाचे शिल्पकार म्हणून ओळखले जातात. ते मानवाधिकारांचे रक्षक, महान तत्त्वज्ञ, समाजवादी, अर्थशास्त्रज्ञ, कायदेतज्ज्ञ, समाजसुधारक, राजकारणी आणि जागतिक पातळीवर प्रसिद्ध बुद्धिजीवी होते. त्यांनी, 'आपण जीवन देऊ शकत नाही, त्यामुळे ते हिरावून घेण्याचा किंवा इतरांचे शोषण करण्याचा अधिकार आपल्याला नाही.', असे म्हटले आहे. 'स्वातंत्र्य आणि स्वैराचार' याबाबत ते मानत की, स्वातंत्र्याचे रूपांतर स्वैराचारात होता कामा नये. त्यामुळे स्वतःचे हक्क जपताना इतरांच्या हक्कांचा आदर करणे आवश्यक आहे. त्यांनी नेहमीच ठामपणे सांगितले की, प्रत्येक व्यक्तीस आपल्या घरात शांतता आणि आरामाचा अधिकार आहे. मोठा आवाज वृद्ध, आजारी व्यक्ती तसेच मुलांच्या आरोग्यावर परिणाम करतो. पक्ष्यांवरही परिणाम होऊन ते घरटी सोडतात किंवा दिशाभूल होतात, असे न्यायालयाने नमूद केले.

# महाराष्ट्र मंत्रिमंडळाच्या झालेल्या बैठकीत 7 निर्णय

**महाराष्ट्राचे AI धोरण जाहीर, हरित आयोग स्थापन, लंडन येथे अध्यासन केंद्र**

**मुंबई :** महाराष्ट्र मंत्रिमंडळाच्या झालेल्या बैठकीत महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या मंत्रिमंडळ बैठकीत महाराष्ट्राचे AI धोरण जाहीर करण्यात आले आहे. लंडनमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन स्थापन करण्यात येणार आहे. तसेच हरित महाराष्ट्र आयोगाची स्थापना करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. महाराष्ट्र राज्य मंत्रिमंडळाच्या झालेल्या या बैठकीत इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुध्दिमत्ता विभाग, वन विभाग, ऊर्जा विभाग, दिव्यांग सक्षमीकरण विभाग, महसूल विभाग, आदिवासी विकास विभागाच्या अंतर्गत महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहे.




### राज्य मंत्रिमंडळाने घेतले 7 मोठे निर्णय

1) एआयच्या विश्वात महाराष्ट्राचे महत्वाकांक्षी पाऊल.
2) सामजिक समता व समरसता वर्षा निमित्त साता समुद्रापार महापुरूषांच्या विचारांचा जागर.
3) हरित महाराष्ट्र आयोगाची स्थापना.
4) राज्यातील हरित ऊर्जेचा वापर आणि पारेषण क्षमतेचे अधिक बळकटीकरण.
5) दिव्यांगाच्या शिक्षण भरारीला आणखी बळ. उच्च माध्यमिक परिक्षोत्तर शिक्षण घेणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती मिळणार.
6) रत्नागिरी जिल्ह्यातील मौजे नाचणे येथे केंद्रीय विद्यालयाला जमीन.
7) आदिवासी आश्रमशाळेतील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना.

### न्यायालयाने शिक्षण उपसंचालकांना कडक शब्दांत फटकारले...

**नागपूर :** स्कूल बस समितीच्या बैठकांची माहिती देणे टाळत असलेल्या शाळांना नोटीस बजावण्याच्या आदेशाची येत्या 9 जूनपर्यंत अंमलबजावणी करण्यात अपयश आल्यास विभागीय शिक्षण उपसंचालकांवर कायद्यानुसार कारवाई केली जाईल. त्यानंतर त्यांना चूक सुधारण्याची पुन्हा संधी दिली जाणार नाही, असे मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने मंगळवारी स्पष्ट केले. या प्रकरणावर न्या. अनिल किलोर व राज वाकोडे यांच्यापुढे सुनावणी झाली. स्कूल बस संचालित करणाऱ्या प्रत्येक शाळेमध्ये स्कूल बस समिती स्थापन करणे आणि दर तीन महिन्यांतून एकदा समितीची बैठक घेणे नियमानुसार बंधनकारक आहे. शहरामध्ये स्कूल बस संचालित करणाऱ्या 131 शाळा आहेत. 6 फेब्रुवारी 2026 रोजी न्यायालयाने या सर्व शाळांना गेल्या दोन वर्षांत आयोजित केलेल्या स्कूल बस समितीच्या बैठकांची माहिती सादर करण्याचे निर्देश दिले होते. दरम्यान, आतापर्यंत केवळ 41 शाळांनीच ही माहिती दिली आहे. याशिवाय, 17 मार्च 2026 रोजी न्यायालयाने ही माहिती देणे टाळत असलेल्या शाळांना शिक्षण उपसंचालकांनी तीन आठवड्यात नोटीस जारी करावी आणि दोन सर्वाधिक खपाच्या मराठी व इंग्रजी वृत्तपत्रांमध्ये सार्वजनिक नोटीसही प्रकाशित करावी, असे आदेश दिले होते; परंतु शिक्षण उपसंचालकांनी त्या आदेशाची अद्याप अंमलबजावणी केली नाही. परिणामी, न्यायालयाने शिक्षण उपसंचालकांना कडक शब्दांत फटकारून त्यांच्यावर कायद्यानुसार कारवाई करण्याचा आदेश शालेय शिक्षण विभागाच्या प्रधान सचिवांना दिला.

### एअर इंडियाच्या पायलटचे हृदयविकाराचा झटक्याने निधन



**नवी दिल्ली :** हजारो फूट उंचीवर विमाने उडवणारे वैमानिक अनेकदा आपल्या सुरक्षित प्रवासाची हमी देतात. पण सुट्टीवर असताना एखाद्या वैमानिकाचा अचानक मृत्यू झाल्यास काय होते? इंडोनेशियातील बालीमधून एक दुःखद आणि धक्कादायक बातमी समोर आली आहे. एअर इंडियाच्या एका वैमानिकाचा अनपेक्षितपणे मृत्यू झाला असून, त्यामुळे विमान कंपनी आणि हवाई वाहतूक क्षेत्रात मोठी खळबळ उडाली आहे. इंडोनेशियातील बाली येथे बुधवारी ही भीषण दुर्घटना घडली. एअर इंडियाचे पायलट अंदाजे 40 वर्षांचे होते आणि ते फर्स्ट ऑफिसर म्हणून कार्यरत होते. मंगळवारी त्यांनी दिल्ली ते बाली हे विमान सुरक्षितपणे उडवले होते. उड्डाणानंतर ते नियमानुसार हॉटेलमध्ये विश्रांती घेत होते. अचानक त्यांना छातीत तीव्र वेदना होऊ लागल्या, ज्याचे रूपांतर हृदयविकाराच्या झटक्यात झाले आणि त्यातच त्यांचा मृत्यू झाला. आपले उड्डाण कर्तव्य पूर्ण केल्यानंतर पायलट बाली येथील एका हॉटेलमध्ये ठरलेल्या कालावधीसाठी विश्रांती घेत होता. विश्रांती घेत असताना त्याला छातीत तीव्र वेदना आणि प्रचंड अस्वस्थता जाणवली. वैमानिकाने तक्रार केल्यानंतर त्याला तात्काळ जवळच्या रुग्णालयात नेण्यात आले. रुग्णालयात तपासणी केल्यानंतर डॉक्टरांनी सांगितले की, त्यांना गंभीर हृदयविकाराचा झटका आला होता. वैद्यकीय पथकाच्या सर्वतोपरी प्रयत्नांनंतरही, या तरुण वैमानिकाला वाचवता आले नाही.

एअरलाइनच्या एका अधिकाऱ्याने स्पष्ट केले की, वैमानिकाला कोणतीही ज्ञात वैद्यकीय समस्या नव्हती. त्याने काही महिन्यांपूर्वी विमान वाहतूक नियामकच्या कठोर नियमांनुसार घेण्यात आलेल्या सर्व आवश्यक वैद्यकीय चाचण्या उत्तीर्ण केल्या होत्या. अधिकाऱ्याने असेही सांगितले की, वैमानिकाने निर्धारित उड्डाण तासांच्या आतच काम केले होते, म्हणजेच त्याच्यावर कोणताही अतिरिक्त कामाचा भार नव्हता.

# नरेंद्र दाभोळकर हत्या प्रकरणात दोषी कळस्करला जामीन मंजूर



**मुंबई :** विवेकवादी नरेंद्र दाभोळकर यांच्या 2013 च्या हत्या प्रकरणात दोषी ठरलेल्या शरद कळस्करला मुंबई उच्च न्यायालयाने बुधवारी जामीन मंजूर केला. हल्लेखोर म्हणून त्याच्या ओळखीबद्दल न्यायालयाने शंका व्यक्त केली आहे. गेल्या वर्षी, न्यायालयाने डाव्या नेते गोविंद पानसरे यांच्या हत्या प्रकरणात कळसेकर यांना जामीन मंजूर केला होता. त्यावेळी न्यायालयाने असे निरीक्षण नोंदवले होते की, ते जवळपास सात वर्षांपासून तुरुंगात आहेत आणि खटल्याची सुनावणी पूर्ण होण्यास खूप वेळ लागत आहे. 20 ऑगस्ट 2013 रोजी पुण्यात मोटारसायकलवरून आलेल्या दोन हल्लेखोरांनी गोळ्या झाडून त्यांची हत्या केली. 2014 मध्ये मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर तपास हाती घेतलेल्या सीबीआयने या गुन्ह्यात अंधुरे आणि कळसकर यांना आरोपी म्हणून नाव दिले. उच्च न्यायालयाने काय म्हटले? न्या.अजय गडकरी आणि रणजित सिंग भोसले यांच्या खंडपीठाने कळसकर यांना 50,000 रुपयांचा जामीन सादर करण्याचे निर्देश देत त्यांच्या सुटकेचा आदेश दिला. न्यायालयाने केंद्रीय अन्वेषण ब्युरोची (CBI) जामीन आदेशाला चार आठवड्यांसाठी स्थगिती देण्याची विनंतीही फेटाळून लावली. न्या. गडकरी म्हणाले, 'आम्ही याचिकाकर्ता कळसकर हाच हल्लेखोर असल्याच्या ओळखीबद्दल आधीच शंका व्यक्त केली असल्याने, आदेशाला स्थगिती देण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.' आदेशाची सविस्तर प्रत सध्या उपलब्ध नाही.

### शालिग्राम उद्धवराव ढोरे यांच निधन



**नागपूर :** छत्रपतीनगर नागभूमी लेआऊट येथील रहिवासी शालिग्राम उद्धवराव ढोरे यांचे बुधवार दि. 29 एप्रिल 2026 रोजी सायंकाळी 4.30 वाजता अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्युसमयी त्यांचे वय 82 वर्षे होते. त्यांची अंत्ययात्रा उद्या दि.30/04/2026 रोजी सकाळी 10 वाजता प्लॉट नंबर 1, नागभूमी लेआऊट, छत्रपती नगर येथून निघेल व सहकारनगर घाटावर अंत्यसंस्कार होतील. त्यांच्या मागे एक मुलगा चार मुली नातवंड व व बराच मोठा आप्त परिवार आहे.






“ अडचणी माणसाला थांबवत नाहीत,
त्या त्याला अधिक मजबूत बनवतात... ”

बहुजन सौरभ
BAHUJAN SAURABHA



बहुजन सौरभ

## संपादकीय

# शिवाजी कोणाचा? वादांची मुळं

महाराष्ट्रात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नावावरून वारंवार वाद उसळतात, हे केवळ योगायोग नाही; ती आपल्या समाजाच्या इतिहास-वाचनातील विसंगती, भावनिक गुंतवणूक आणि राजकीय उपयोगितेची परिणती आहे. ‘शिवाजी कोणाचा?’ हा प्रश्न प्रत्यक्षात इतिहासाचा नसून, तो प्रतिमांचा, वर्चस्वाचा आणि सांस्कृतिक मालकी हक्काचा प्रश्न बनला आहे. म्हणूनच प्रत्येक वेळी एखाद्या लेखकाने, वक्त्याने किंवा कार्यकर्त्याने शिवाजी महाराजांचा वेगळ्या दृष्टीकोनातून उल्लेख केला की, महाराष्ट्रात वादळ उठते. प्रश्न एकेरी उल्लेखाचा आहे का? की त्या उल्लेखामागील हेतूचा? समाजात आई-वडील, देव, नातेसंबंध यांमध्ये एकेरी उल्लेख हा अपमान मानला जात नाही, तर तो जवळिकीचा भाग असतो. मग इतिहासकारांनी किंवा लेखकांनी केलेला एकेरी उल्लेख का वादग्रस्त ठरतो? कारण इथे भाषा नव्हे, तर भावनांवर नियंत्रण मिळवण्याची स्पर्धा आहे. शिवाजी महाराज हे केवळ ऐतिहासिक व्यक्तिमत्त्व राहिलेले नाहीत; ते अस्मितेचे, ओळखीचे आणि सत्तेचे प्रतीक बनले आहेत. गोविंद पानसरे यांनी ‘शिवाजी कोण होता’ या पुस्तकातून शिवाजी महाराजांना ‘जनतेचा राजा’ म्हणून मांडले. त्यांचा उद्देश अपमान नव्हता, तर इतिहासाला सामाजिक न्यायाच्या चौकटीतून समजून घेण्याचा होता. त्याचप्रमाणे श्रीपाद अमृत डांगे, वा. सी. बेंद्रे, पंढरीनाथ रानडे, गोविंद सखाराम सरदेसाई अशा अनेकांनी विविध काळात शिवाजी महाराजांचे विश्लेषण केले. या सर्वांच्या लिखाणात एकेरी उल्लेख आढळतो; पण त्यामागे अनादर नसून, चिकित्सक दृष्टी आणि अभ्यासपूर्ण मांडणी आहे. मात्र, समाजाने ही पुस्तके किती वाचली? हा प्रश्न अस्वस्थ करणारा आहे. वास्तव हेच की, महाराष्ट्रात इतिहासाचे वाचन कमी आणि ऐकिव, भावनिक प्रतिमा जास्त प्रभावी ठरल्या. याउलट डॉ. बाबासाहेब पुरंदरे यांचे ‘राजा शिवछत्रपती’ हे पुस्तक घराघरात पोहोचले. त्यांच्या लालित्यपूर्ण शैलीमुळे शिवाजी महाराजांची एक ठराविक प्रतिमा - ‘धर्मवीर’, ‘गोब्राह्मण प्रतिपालक’ - लोकांच्या मनात खोलवर रुजली. लोकप्रियता हीच सत्य मानण्याची प्रवृत्ती वाढली आणि चिकित्सक दृष्टी मागे पडली. यातूनच मुख्य संघर्ष निर्माण होतो, ‘शिवाजी महाराजांची प्रतिमा कोण ठरवणार?1 एक गट त्यांना धर्मरक्षक म्हणून पाहतो; दुसरा गट त्यांना रयतेचा, बहुजनांचा, स्त्री-सुरक्षेचा राजा मानतो. प्रत्यक्षात शिवाजी महाराजांचे व्यक्तिमत्त्व इतके व्यापक आहे की, ते एका चौकटीत बसत नाही. पण समाजाला सोप्या, स्पष्ट आणि भावनिक प्रतिमा हव्या असतात. म्हणूनच गुंतागुंतीचा इतिहास बाजूला राहतो आणि साध्या, घोषणात्मक प्रतिमा पुढे येतात. आजचे वाद हे इतिहासावर नसून ‘मालकी हक्कावर’ आहेत. ‘आमचा शिवाजी’ विरुद्ध ‘तुमचा शिवाजी’ - हा संघर्ष वाढत चालला आहे. यामध्ये राजकारणाची भूमिका नाकारता येत नाही. प्रत्येक विचारसरणीला स्वतःचा शिवाजी हवा आहे. त्यामुळे इतिहास संशोधनापेक्षा घोषणाबाजीला महत्त्व मिळते. परिणामी, समाजात संवादाऐवजी संघर्ष वाढतो. एकेरी उल्लेखाचा मुद्दा हा केवळ निमित्त आहे. खरा प्रश्न आहे, आपण इतिहासाला किती खुलेपणाने स्वीकारतो? आपण वेगवेगळ्या दृष्टीकोनांना जागा देतो का? की लगेच ‘अपमान’ म्हणून प्रतिक्रिया देतो? जर प्रत्येक चिकित्सक मताला विरोधच केला, तर इतिहास हा अभ्यासाचा विषय न राहता, अंधश्रद्धेचा विषय बनतो. शिवाजी महाराजांना ‘नजरकैदेत’ ठेवण्याचा प्रयत्नही याचाच भाग आहे. जेव्हा एखाद्या वर्गाने किंवा विचारसरणीने त्यांना स्वतःपुरते मर्यादित केले, तेव्हा इतरांना तो शिवाजी स्वीकारार्ह वाटत नाही. परिणामी, संघर्ष वाढतो. शिवाजी महाराजांची खरी ताकद त्यांच्या समावेशकतेत होती. त्यांनी विविध जाती, धर्म, समाजघटक यांना एकत्र आणले. पण आज आपण त्यांच्याच नावावर विभागलो आहोत, ही मोठी शोकांतिका आहे. आज गरज आहे ती आत्मचिंतनाची. महाराष्ट्रातील बुद्धिजीवी, लेखक, कार्यकर्ते आणि सर्वसामान्य नागरिक यांनी स्वतःला प्रश्न विचारला पाहिजे, आपण शिवाजी महाराजांना समजून घेतो आहोत का, की फक्त त्यांचा उपयोग करतो आहोत? इतिहास वाचण्याची, विविध मते ऐकण्याची आणि मतभेद सहन करण्याची क्षमता विकसित केली नाही, तर असे वाद थांबणार नाहीत. शेवटी, शिवाजी महाराज हे एका गटाचे नाहीत, तर संपूर्ण समाजाचे आहेत. त्यांना एका चौकटीत बंदिस्त करणे म्हणजे त्यांच्या महानतेचा अपमानच होय. ‘कोण होता शिवाजी?’ या प्रश्नाचे एकच उत्तर नसू शकते आणि तेच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. वाद थांबवायचे असतील, तर घोषणांपेक्षा अभ्यास आणि भावनांपेक्षा विवेक यांना प्राधान्य द्यावे लागेल. अन्यथा ‘मुजरे’ चालूच राहतील आणि खरा शिवाजी इतिहासाच्या धुळीत हरवत जाईल. ■ ■

# समतेसाठी ग्रामजयंती

**ग्राम, ग्रामस्थ आणि ग्रामगीता या तीन सुत्रांवर राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराजांचे वैचारिक अधिष्ठान विराजमान आहे. भारत हा देश कृषीप्रधान असून गाव - खेड्यांचा मिळून बनलेला आहे. गावातील माणसं आपली नाती जमिनीशी जोडून ठेवतात. आपले इमान जपतात. काळ्या आईची प्रतारणा कधी करीत नाही. तिच्यासाठी जिवाची बाजी लावतात. या सर्व गोष्टींची राष्ट्रसंतांना जाणीव असल्यामुळे त्यांच्या श्रमाला प्रतिष्ठा मिळावी, त्यांच्याकडे अवघ्या देशाचे लक्ष जावे म्हणून त्यांनी आपल्या कार्याच्या अग्रभागी ग्रामसुधारणेला विशेष महत्व दिले.**

विसावे शतक जागतिक पातळीवर स्थित्यंतराचे शतक गणल्या जाते. आध्यात्म आणि विज्ञान यांच्या समन्वयातून माणूस या काळात उच्चकोटीची उड्डाने भरू लागला होता. नव विचारांचे वारे सीमा ओलांडून वाहू लागले होते. बहुजनांना बंद असलेली शिक्षणाची कवाडे उघडल्या गेली होती. शिक्षणामुळे अज्ञान, अंधश्रद्धेला हादरे बसू लागले. गतानुगतिक विचार हद्दपार होण्याची वेळ आली. बहुतेकांच्या जीवनशैलीत बदलांमुळे तारतम्यता येऊ लागली. संत व सुधारक प्रकर्षाने सत्याचा प्रचार व प्रसार करू लागले. संताच्या परंपरेतील दोन वैदर्भिय संत अध्यात्म व विज्ञानाचा वारसा पुढे चालवित गावोगाव जागरण करीत राहिले. एकाने हातात स्वच्छतेचा झाडू घेतला तर दुसऱ्याने बधिर झालेल्या समाजाला जागे करण्यासाठी हातात खंजरी घेतली. कर्मयोगी गाडगेबाबा आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हे दोघेही मानवतेचे पुजारी होते. त्यांनी माणसात देव पाहिला. दगडातला देव नाकारला. राष्ट्रसंतांनी ग्रामातल्या शेतकऱ्याला ग्रामनाथ संबोधने यातच माणसातला देव जागवणे आले. या जागृतीसाठी ग्रामगीतेची निर्मिती झाली आहे.

मध्ययुगीन काळात संतांनी अध्यात्माच्या आधारे समाज जागृती केली.संत नामदेव, संत ज्ञानेश्वर ते संत तुकाराम या सत्पुरूषांनी धर्माभिमानी ब्राम्हण पंडिताकडून झालेला छळ सोसला. परंतु समाजाला शहाणे करण्याचे आपले व्रत सोडले नाही. त्या काळात अठरापगड जाती-जमातीतून संत जन्माला आले. आपल्या अधिकार क्षेत्राच्या बाहेर पडून त्यांनी धर्मसुधारणेचा प्रयत्न केला. त्याकरिता अभंगरूपी साहित्याची निर्मिती केली. त्यांनी चातुर्वर्ण्य प्रणित चौकटीचा निषेध केला. आपल्या व्यथा-वेदना महाराष्ट्राचे आराध्य दैवत पांडुरंगाला ऐकवल्यात. त्याला माऊलीच्या रूपात पाहिले. आपले सुःख-दुःख आईलाच सांगायचे असते. पंढरपूर सर्वाचे माहेरघर बनले. आपल्या दुःखाची गाठ सैल करण्यासाठी संत मंडळींनी आषाढी-कार्तिकीची वारी सुरू केली. धारकरी-वारकरी, शेतकरी-कष्टकरी विठ्ठलाला भेटण्यास या निमित्ताने आतूर असायचा. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज देखील आपल्या बालपणापासून वारीला जायचे. ती वारी त्यांनी आयुष्याच्या अंतापर्यंत कधीही चुकविली नाही. ‘ग्रामगीता’ त्यांना पंढरपुरातील चंद्रभागेच्या तिरावर स्फुरलेली आहे. त्यांचा विठ्ठल विश्वाच्या विटेवर त्यांनी उभा केला. आपल्या विचारांना वैश्विकतेचा आयाम दिला. राष्ट्रसंतांचा गाव हा विश्वाचा नकाशा आहे. गावावरून देशाची परीक्षा होते, असे त्यांचे सांगणे आहे. गावातले गावपण जर भंगले तर गावात अवदशा येईल, हेही त्यांनी सांगून ठेवले आहे. असे घडू नये म्हणून आपल्या गावालाच तीर्थाचा दर्जा देण्याचा विचार आपल्या प्रबोधनातून त्यांनी सातत्याने मांडला. त्यांची आदर्श ग्रामाची संकल्पना त्यावेळी गावागावातून प्रत्यक्षात उतरली होती. स्वातंत्र्यापूर्वी आणि स्वातंत्र्यानंतरही श्री गुरूदेव सेवा मंडळाच्या माध्यमातून चाळीस हजार गावे आदर्शाचा वस्तूपाठ झालीत. राष्ट्रसंतांच्या झंझावती प्रचाराने व प्रभावाने हे घडत होते. याची दखल देशाचे पहिले राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद आणि प्रधानमंत्री पं.जवाहरलाल नेहरू यांनीही घेतलेली दिसते. राष्ट्रपिता महात्मा गांधी पासून इंदिरा गांधी पर्यंतचे सारे पुढारी व समाज कार्यकर्ते राष्ट्रसंतांच्या अशा विधायक कामामुळे प्रभावित होते. कारण असे कार्य देशाच्या जडणघडणीत मोलाचे होते. विश्वाच्या नकाशावर भारताला विशेष स्थान देण्यात राष्ट्रसंतांचे योगदान मान्य करावेच लागते.



सुरेंद्र बुराडे
मो. 9860262122

भारतात संत-महापुरूषांच्या जयंतीची मोठी परंपरा आहे. यानिमित्ताने त्यांच्या कार्याची उजळणी होते व त्यापासून अनेकांना प्रेरणा मिळावी ही अपेक्षाही असते. वंदनीय राष्ट्रसंतांच्या हयातीतच त्यांच्या जयंतीची कल्पना काही गुरूदेव सेवकांच्या मनात आली. याला त्यांनी प्रथमदर्शनी नकार दिला होता. यामागे व्यक्तीमहात्म्य वाढवू नये, अशी त्यांची धारणा होती. पण जेव्हा गुरूदेव सेवकांचा अट्टाहास कमी होईना तेव्हा त्यांनी जो पर्याय सुचवला त्यातच त्यांच्या मनातील गावाविषयीचे अथांग प्रेम प्रगट होते. ते म्हणाले, ‘आपणाला माझी जयंती कराविशी वाटते ना, तेव्हा ती माझी न करता सर्व गावांची जयंती करा. त्याला ‘ग्रामजयंती’ म्हणा.’ एका अभिनव कल्पनेला राष्ट्रसंतांनी अशातऱ्हेने मूर्त रूप दिले. ही जयंती एक दिवस न करता संपूर्ण एप्रिल महिनाभर विविध उपक्रमांनी गावागावातून उत्साहाने साजरी व्हावी, असा विचार त्यांनी व्यक्त केला. तेव्हापासून ग्राम जयंतीच्या पर्वाला सुरूवात झाली. ग्रामविकासाची ही गुरूकिल्ली ठरली.



आपण जरी आज शहरवासी झालो असलो तरी आजची महानगरे कालची खेडीच होती. बहुतेक शहरात स्थायिक झालेल्यांची नाळ ही गावाकडेच जुळलेली असते. शिक्षणाच्या व नोकरीच्या निमित्ताने बरीच मंडळी गावाकडून शहराकडे धाव घेतात. पुढे कायमची शहरातच स्थिरावतात. हे सध्याच्या परीस्थितीत खरे असले तरी आपले जन्मगाव विसरणे, त्याकडे कायमची पाठ करणे हा कृतघ्नपणा होईल. तो होऊ नये याकरिता आपल्या गावाच्या विकासात स्वतःचा हातभार लावणे, हे देखील ग्रामजयंती करण्यासारखेच आहे. राष्ट्रसंतांना प्रत्येक भारतीयांकडून अशा संकल्पाची अपेक्षा आहे. महात्मा गांधीजींचा ‘गावाकडे चला’ या संदेशामागे ग्रामोन्नतीचा विचार होता. स्वातंत्र्याच्या अंतिम निर्णायक आंदोलनाच्या काळात ते स्वतः वर्धा शहराजवळील ‘सेवाग्राम’ या गावात येऊन आश्रमवासी झालेत. राष्ट्रसंतांनी देखील अमरावती जिल्ह्यातील मोझरीजवळ ‘गुरूकुंज’ आश्रम स्थापन करून आदर्श ‘श्री गुरूदेव नगर’ स्थापित केले. त्यापासून अनेक गावांनी प्रेरणा घेतली. राष्ट्रपिता ते राष्ट्रसंत यांच्या विचारांचा गाभा ग्रमोद्धारात सापडतो. गावे स्वावलंबी व्हावीत याकरीता कार्यक्रमांची पंचसुत्रे त्यांनी भारतीयांना दिली. ज्यांनी हा विचार स्वीकारला ती मंडळी शहरीकरणापासून दूर झालीत. त्यांनी गावकुसात आपल्या विधायक कामांना सुरूवात केली. अशा कित्येक कर्त्या सुधारकांची नावे तरूणांपुढे आहे. या सुधारकांची प्रेरणा ‘ग्राम-ग्रामनाथ-ग्रामगीता’ या त्रिसुत्रीत सापडते.

आज गावपातळीवरील सामंजस्याचे वातावरण कमी-अधिक बिघडलेले दिसते. याला कारण राजकारणाचा संसर्ग. सत्तालोभी राजकारणामुळे जातीयवाद वाढलेला गावागावातून पहायला मिळतो. धार्मिक तनाव सुद्धा गावातून वेळप्रसंगी उफाळून येतो. यामुळे सौहार्द टिकून राहात नाही. एकोपा दिसत नाही. याकरिताच राष्ट्रसंताचा गावागावाला जागवण्याचा जागर होता. गावातील भेदभाव समूळ मिटवण्याचा प्रयत्न होता. ग्रामोन्नतीचा दिवा उजळला तरच हे शक्य आहे. आपल्या गावाची उन्नती सामूहिक एकोप्यात आहे, हे सगळ्यांना कळले पाहिजे. पृथ्वीतलावर गावाची जयंती होणे हा अद्भूत महोत्सव आहे. तोही राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराजांच्या जन्म दिवसाच्या निमित्ताने होतोय ही घटना गुरूदेव प्रेमींसाठी स्फूर्तीदायक घटना होय. स्वराज्याचे सुराज्य करण्यात गावांचा सिंहाचा वाटा राहिल, ही कल्पना राष्ट्रसंतांना समजली होती. तसे सुराज्य आजही दृष्टिपथात दिसत नाही. ते साकार करण्यासाठी वंदनीय राष्ट्रसंतांचे विचार अंगिकारणे व अंमलात आणणे हीच काळाची गरज आहे. हीच क्रांतीची हाक आहे म्हणून राष्ट्रसंत भारतातील श्रीमंतांना, अधिकाऱ्यांना, पंडितांना, सुशिक्षितांना, साधुसंतांना गावांच्या उन्नतीसाठी उत्साहाने कामाची गुढी उभारायला सांगतात. ग्रामजयंतीचा मंत्र घेऊन देशात समतेची वीण विणायला सांगतात. देशातील पाच लाख गावे राष्ट्रसंतांच्या विचाराने स्वावलंबी झाली तर सुराज्याचे स्वप्न दूर नही. आवश्यकता आहे भारतीय ग्रामनाथांच्या इच्छाशक्तीची! राज्यकर्त्यांची!! ■ ■

# ग्रामजयंतीचा संकल्प

*‘गाव हा विश्वाचा नकाशा । गावावरून देशाची परीक्षा ।*
*गावचि भंगता अवस्था। येईल देशा।*
*वनीतीर्थी फिरोनि आला । आपुला गाव नाही सुधारला।*
*तो कैसा म्हणावा महाभला । एकटाची?’*

वरील ओव्या या राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या ग्रामगीतेमधल्या आहेत. या ग्रंथात प्रामुख्याने तुकडोजी महाराजांची गावाबद्दल असलेली प्रेम, सद्भावना गावाची प्रगती तसेच ‘शेतकरी, कष्टकरी, भोळाभाबडा आमचा हा शेतकरी अन्नदाता’ त्याच्या विषयीची कळवळा या ग्रंथातून मांडली आहे.



ग्रामजयंती म्हणजे गावाचा उत्सव, गावाचा वाढदिवस, एखाद्याचा वाढदिवस साजरा करताना आपण त्या व्यक्तीला प्रेम, जिव्हाळा देतो, त्याच्या उज्ज्वल भविष्यासाठी आपण त्याला आशीर्वाद देतो, त्याला भरभरून शुभेच्छा देतो, त्याला सुंदर कपडे आणतो. म्हणजेच एकंदरीत त्याच्या प्रगतीसाठी कृतीपूर्ण सहभाग नोंदवतो आणि नेमकी हीच बाब गावाला लागू आहे. राष्ट्रसंतांच्या ग्रामजयंती संकल्पनेत गावाचा सर्वांगीण विकास अभिप्रेत आहे. गावे स्वच्छ, सुंदर, निर्मळ, आनंदी, आरोग्यसंपन्न राहावीत, माणसातली माणुसकी असावी, एकमेकांप्रती जिव्हाळा निर्माण व्हावा. सर्वधर्मसमभाव असावा, तरुणांनी, युवकांनी वीर आणि शीलवान असावे, परंपरागत अनिष्ट रुढी, जाती-धर्म-पंथ भेद, अंधश्रद्धा, समूळ आणि पूर्णपणे नष्ट व्हाव्यात. शेती आधुनिक व्हावी. गावागावात वाचनालय, व्यायामशाळा, खेळाचे मैदान व्हावे. शालेय शिक्षणासोबतच व्यायाम कसरती, उठण्याबसण्या, बोलण्या, वागण्याच्या शिक्षणावर भर असावा. याचा प्राधान्याने विचार करुन तसे संस्कार तरुणांवर व्हावेत. गावात वृद्धांचा आदर व्हावा. जागोजागी उद्याने उभी राहावी आणि आपले गाव नंदनवन व्हावे, ग्रामविकासाची कामे सुरू झाली पाहिजेत. गावात समानता प्रस्थापित झाली पाहिजे, परस्परांच्या अडचणी समजावून घेऊन त्या सहाकार्याने सोडविल्या पाहिजेत. हे राष्ट्रसंतांचे मोठे स्वप्न होते. हे स्वप्न प्रत्यक्षात उतरावे आणि त्यादृष्टीने गावांनी विचार करावा. त्यासाठी ग्रामजयंती हा सण झाला पाहिजे.

***अरे उठा, उठा, श्रीमंतांनो, अधिकाऱ्यांनो, पंडितांनो, सुशिक्षितांनो, साधुसंतांनो, हाक आली क्रांतीची।***
***गावा गावासि जागवा, भेदभाव हा समूळ मिटवा, उजळा ग्रामोन्नतीचा दिवा।***

या दोन ओव्या वाचल्या तरी संत तुकडोजी महाराजांची ग्राम कल्याणाविषयीची आर्त हाक पूर्णपणे लक्षात येते. ग्रामविकास झाला तरच देशविकास होईल. कारण मूळ भारत हा आजही खेड्यातच वसलेला आहे. ग्रामस्थांच्या हातांना रोजगार मिळाला तर ते शहराकडे धाव घेणार नाहीत, शहराच्या सुव्यवस्थेवर अतिरिक्त भार येणार नाही, गाव संपन्न होतील आणि पर्यायाने राष्ट्रही संपन्न होईल. ग्रामविकासाकडे भर देत तुकडोजी महाराजांनी केलेली ही ग्रामगीता निर्मिती म्हणजे दूरदृष्टीने केलेले भाकीतच म्हणता येईल. त्यांची संपूर्ण ग्रामगीता वाचली तर तुकडोजी महाराजांची ग्रामविकासाबद्दल असलेली कळकळ शब्दाशब्दातून जाणवेल.



हेमंत हरिदासजी भोंबे
मो. 8483847467

भारत हा खेड्यांचा देश आहे, हे लक्षात घेऊन ग्रामविकास झाला की राष्ट्राचा विकास होईल, अशी तुकडोजी महाराजांची श्रद्धा व विचारसरणी होती. समाजातल्या सर्व घटकांतील लोकांचा उद्धार कसा होईल, याविषयी त्यांनी अहर्निश चिंता केली. ग्रामोन्नती व ग्रामकल्याण हा त्यांच्या विचारसरणीचा जणू केंद्रबिंदूच होता. भारतातील खेड्यांच्या स्थितीची त्यांना पुरेपूर कल्पना होती. त्यामुळे त्यांनी ग्रामविकासाच्या विविध समस्यांचा मूलभूतस्वरूपी विचार केला व त्या समस्या कशा सोडवाव्यात, याविषयी उपाययोजनाही सुचविली. या उपाययोजना त्यांच्या काळाला तर उपकारक ठरल्याच पण त्यानंतरच्या काळालाही उचित ठरल्या. ग्रामस्वच्छतेचा व ग्रामविकासाच्या संदेश त्यांनी ग्रामगीता या साहित्यातून दिला.

***ग्रामगीता या ग्रंथाबाबत तुकडोजी महाराज म्हणत, ग्रामगीता माझे हृदय, त्यांत बसले सद्गुरुराय, बोध त्यांचा प्रकाशमय, दिपवोनि सोडील ग्रामासि ।***

तुकडोजी महाराजांची ‘ग्रामगीता’ म्हणजे त्यांच्या मनात घर करून राहिलेल्या गावाचे, ग्रामसंस्कृती आणि ग्रामविकासाचे नितळ रूप होय. ग्रामगीता म्हणजे गाव-खेड्यांसाठी जणू दुसरी श्रीमद भगवद्गीता म्हणावी लागेल. हा गाव सुखी व्हावा. सर्वार्थाने समृद्ध व्हावा. परस्परांचा स्नेहभाव जागवावा. ज्यांचे हात श्रमांसाठी पुढे सरसावले आहेत, त्यांच्या श्रमांना प्रतिष्ठा मिळावी, मानवतेचे तेज झळाळावे, या तळमळीने त्यांनी ही ग्रामगीता अर्पण करून ग्रामजीवनात समृद्धी आणणारी ग्रामदेवता जनमनात जागवली. विशेषतः त्यांनी गावांना केंद्रबिंदू ठेवून गाव कसा असावा? गावातील लोकांचे वर्तन, आचरण कसे असावे? गावपुढारी, समाजसेवक कसा असावा? त्यांची गावापरी कर्तव्य काय असावेत? ग्रामविकास कसा घडवता येईल? गावातील तरुणांनी यासाठी कसे प्रयत्नशील राहावे? इत्यादी विचार साध्या-सोप्या आणि अगदी सरळ भाषेत परखडपणे मांडले आहेत. ग्रामोन्नतीच्या तळमळीतून प्रकटलेले आर्त उद्गार म्हणजे ग्रामगीता होय. ग्रामजयंतीदिनी राष्ट्रसंताची ग्रामगीता खऱ्या अर्थाने कृतीत आणण्याचा संकल्प करु या. ग्रामगीतेतील विचार गावात प्रत्यक्षात आणण्यासाठी प्रयत्न करणे म्हणजेच राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांना अभिप्रेत ग्रामजयंती आणि तिच राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची जयंती. अश्या या महामानवाला मानवतेच्या महान पुजारीला त्यांच्या जयंती दिनी त्रिवार वंदन आणि अभिवादन! धन्यवाद! ■ ■

# बळीराम अंतारामजी उईके यांची शतकाकडे वाटचाल !

## कर्तव्यदक्ष अधिकारी

म.न.प. मोटपा, जि. नागपूर येथे असतांना सकाळी तयार होऊन फिरवयास निघालो, तेव्हा एक व्यक्ती कचाटातून एक बकरा घेऊन जातांना दिसला. बकरा बिमार असल्याचे दिसून आले. व्हेटरनरी डॉक्टरला विचारले असता बकऱ्याची अंदाजे 5-30 किलो मटन जप्त केला. तद्नंतर खताच्या खड्यात त्यांच्यावर फिनाईल टाकून मटन जमीनीत पुरवण्यात आले. सर्वसामान्य लोकांच्या जिवनाशी खेळणारा हा प्रकार किळसवाणा आहे हे लक्षात येते. सरकारी नोकरी करतांना समाजाच्या उत्थानासाठी विविध समाजोपयोगी कामे अखंड, निःस्वार्थी भावनेने आदरणीय बळीरामजी उईके यांनी केले आहेत. कितीतरी आदिवासीच्या जमिनीचे प्रकरण निकाली काढून त्यांना न्याय मिळवून देण्याचा शतप्रतिशत प्रयत्न केलेला आहे.



भंडारा जिल्ह्याचे मा. जयंतकुमार बांटीया, जिल्हाधिकारी असतांना देवरी येथे तहसिलदार म्हणून बदली झाली. तसेच नागपूरला, अतिरिक्त जिल्हाधिकारी असतांना माझ्याकडे कळमेश्वर येथे नायब तहसिलदाराचे पद होते. कळमेश्वर दौऱ्यावर असतांना त्यावेळी मा. भगवंतराव गायकवाड हे कृषीमंत्री होते. त्यांचेकडे कोष्टी समाजाची मुलगी घरकामाला होती तसेच ती मुलगी प्रयोगशाळा अटेन्डेट सहाय्यक म्हणून शाळेला होती. अशोक धार्मिक नावाचा कर्मचारी शाळेत कर्मचारी होता. तो कधीच वेळेवर कार्यालयात जात नसे. तसेच कधीकधी तीन - चार दिवस अनुपस्थित असायचा. परंतु मुख्याध्यापक त्यांच्याकडे लक्ष देत नव्हते. तो सुट्टीवर असतांना सुद्धा हजेरीपटावर स्वाक्षरी करीत असे. हे मला कळले. एके दिवशी मी अचानक शाळेला भेट दिली असता चार दिवसापासून शाळेत अनुपस्थितीत होता. हजेरीपटावर स्वाक्षरी नव्हती, मी धार्मिक या कर्मचाऱ्यांच्या सुट्या LWP ( Leave Without Pay) केल्या. सत्य तेच केले. हंगामा झाला. तद्नंतर देवरीला पुन्हा तहसिलदार म्हणून बदली झाली. मा. जिल्हाधिकारी जयंतकुमार बांटीया याची भेट झाली तेव्हा म्हणाले तुम्ही एस.डी.ओ. ला सर्टिफाईड करा तद नंतर मी तुम्हाला आदिवासीच्या जमिनीचे प्रकरण निकाली काढण्यासाठी देवरीला आणले आहे. आदिवासी रेस्टोरेशन कायदाप्रमाणे आदिवासी जमिनीचे प्रकरण निकाली काढणे अत्यावश्यक आहे तुम्ही ते कराल याची मला खात्री आहे. मी कामाला लागलो. मा. जिल्हाधिकारी यांच्या आदेशानूसार जमिनी प्रकरणाचे अध्ययन करून जवळपास 25 ते 30 प्रकरणे रेस्टीरेशन ॲक्टप्रमाणे गैर आदिवासीच्या वाहित जमिनी आदिवासी (मूळ) ना प्राप्त होण्यासाठी अथक प्रयत्न केले. तेव्हा फार मोठा हंगामा झाला. श्री जिवनबाबू मडावी, डि.एस.पी. कडे पोलीस संरक्षणासाठी जमिनीचा ताबा घेण्यासाठी दोन पोलिसांची मागणी केली असता उलट डि.एस.पी. यांनी दोन पोलिसांची हमी कोण घेणार? असा प्रश्न उपस्थित केला. तेव्हा मी म्हणालो (जिवनबाबू यांना) तुम्ही 15-20 जवान पोटमजूरीने करा, धानाचे भारे (कापलेले धान) ट्रॅक्टरने भरून जेथे न्यायचे तेथे न्या. काही मजूर शेतात राहतील, उरलेले मजूर ट्रॅक्टरसोबत धानाचे भारे घेवून जातील. अशाप्रकारे जमिन व धानाचे भारे दोन्ही मिळवून दिले, तसेच कोसमतोंडीचे रामचंद्र बाबू पंधरे याची जमिन पोवाराकडे होतो, त्याकरीता शेतजमिन परत करण्याचा आदेश दिला पण गैर आदिवासी जमिन शेत सोडायला तयार नव्हता. एक दिवस जांभळीला जात असतांना गैर आदिवासी सोडण्यात आलेली जमिन वहात होता. अचानक रामचंद्रबापू पंधरे रस्त्यावर मिळाला त्यांनी आपली व्यथा सांगितली मी त्यांना आता वाहू द्या. रेवना होऊ द्या, धान तयार झाले की मी तुम्हाला सांगतो तसे करा मला जमिनी परत करण्यासाठी आदेश दिल्यानंतर गैरआदिवासी बळजबरीने जमिन देण्यास तयार नव्हते. त्यांच्याकडे सर्व सुखसोयी, धनाढ्य तथा पटिलकीचा आव आणायचे. अपमानकारक शब्द ते बोलायचे. त्यामुळे आदिवासीच्या जमिनी परत मिळविण्यासाठी अथक प्रयत्न तथा कायद्याचे, संविधानाचा आधार घेऊन खऱ्या आदिवासींना जमिनी परत मिळाव्या म्हणून वरिष्ठ अधिकारी, कर्मचारी, शिपाई यांचे सहकार्यामुळे जमिनीचे प्रकरण निकाली काढण्यात मदत झाली. गैर आदिवासी कास्तकार यांनी जमिनी द्यायला मनापासून तयार नव्हते. परंतु त्याचे डॉयलाग, टोमणे सहन करण्याची या प्रकारापासून मोठे पाठबळ व ‘सत्य वदं, कर्म कर धर्म चर’ याची प्रचिती अनुभवता आले. गैर आदिवासी जमिनीदार म्हणायचे, ‘‘मोठा आला तहसिलदार, असे कई पाहिले, आले नी गेले!’’ मी याकडे लक्ष न देता जमिनी त्यांना कसे मिळवून देता येईल यावर लक्ष केंद्रित करून वरीष्ठ अधिकाऱ्याच्या मार्ग दर्शन तथा संविधानिक मार्गाचा वापर करून आदिवासींना (खऱ्या) त्यांच्या जमिनी मिळाव्या म्हणून अथक परिश्रम करून न्याय देण्याचा पूरेपूर प्रयत्न केला याचे मला समाधान तथा स्वाभिमान आहे.

**आदिवासी अस्तित्व**



प्रा. डॉ. वामन शेळमाके
मो. 9420973248

क्रमशः ■ ■

# श्रद्धा की अंधश्रद्धा?



**मानसिक आरोग्याच्या दृष्टिकोनातून बागेश्वर बाबा वादाचे विश्लेषण**

श्रद्धा, अंधश्रद्धा आणि मानसिक आरोग्य बागेश्वर बाबा वादाच्या पार्श्वभूमीवर, भारतात न्यायमूर्ती भूषण गवई यांनी बागेश्वर धामला दिलेल्या भेटीने पुन्हा एकदा श्रद्धा विरुद्ध अंधश्रद्धाचा जुना वाद पेटवला आहे. अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे संस्थापक संघटक प्रा. श्याम मानव यांनी यावर तीव्र टीका केली. पण या वादाकडे फक्त राजकीय किंवा सामाजिक दृष्टिकोनातून नव्हे, तर मानसिक आरोग्याच्या दृष्टिकोनातून पाहिले तर काय दिसते? हा लेख त्याच विषयावर आहे.

**मानसिक आरोग्य आणि श्रद्धेचा संबंध :-** मानसिक आरोग्य (mental health) म्हणजे केवळ आजार असणे नव्हे, तर तणाव, चिंता, नैराश्य यांचा सामना करत जीवन जगण्याची क्षमता. भारतात लाखो लोक धार्मिक श्रद्धा, मंदिर-दर्शन, कथा-कीर्तन किंवा बाबांच्या ‘दरबार’ मधून भावनिक सांत्वन (emotional solace) घेतात. बागेश्वर बाबा, न्यायमूर्ती आणि मानसिक आरोग्य श्रद्धा-विज्ञान यांच्यातील सीमारेषा ही अत्यंत पुसट असते, हे सांत्वन placebo effect सारखे काम करू शकते. placebo की सापळा? भारतातील faith healing आणि मानसिक आरोग्य यावर अभ्यास करणे अत्यंत आवश्यक आहे. Placebo effect म्हणजे जेव्हा एखाद्या व्यक्तीला विश्वास वाटतो की ‘हे मला बरे करेल’, तेव्हा मेंदूत एंडोर्फिन्स आणि इतर रसायने सोडली जातात, ज्यामुळे वेदना, चिंता किंवा नैराश्य कमी होऊ शकते. धार्मिक विधी, गुरूंचा आशीर्वाद किंवा सामुदायिक प्रार्थना यामुळे काही लोकांना तात्कालिक रिलीफ मिळते. अभ्यास दाखवतात की आध्यात्मिकता (spirituality) तणाव कमी करण्यात, coping mechanisms मजबूत करण्यात आणि काही प्रमाणात depressive symptoms कमी करण्यात मदत करू शकते. याचा फायदा हे बुआ, बाबा, मांत्रिक, तांत्रिक आणि माणसांचे शोषण करणारे राजकीय पुढारी घेतात. यामुळे मानसिक आरोग्य आणि अंधश्रद्धा बागेश्वर धाम भेटीचा समाजावर गहन परिणाम होऊ शकतो. बागेश्वर बाबांच्या ‘दिव्य दरबार’ मध्ये येणारे लोक अनेकदा आर्थिक समस्या, कौटुंबिक कलह, चिंता किंवा ‘भूत-प्रेत’ च्या भीतीने येतात. त्यांना ‘बाबा मन वाचतात’ किंवा ‘समस्या सोडवतात’ असे वाटले की तात्पुरते आशेचे बीज रुजते. हे मानसिकदृष्ट्या सकारात्मक असू शकते, अंधश्रद्धा मानसिक आरोग्याला कशी हानी पोहोचवते? बागेश्वर वादाचे मनोवैज्ञानिक विश्लेषण आपण येथे करत आहोत. विशेषतः जिथे आधुनिक मानसिक आरोग्य सेवा (psychiatrist, Psychotherapist, PSW, counselor) महाग, दुर्मीळ असलेली आहेत. त्या ठिकाणी लोक बुआ-बाबाकडे वळतात.

**धोके आणि नकारात्मक प्रभाव :-** दुसरीकडे, अंधश्रद्धाचे मानसिक आरोग्यावर गंभीर दुष्परिणाम होऊ शकतात. उशीर आणि गैरउपचार ज्यांना खरा मानसिक आजार (जसे schizophrenia, severe depression, bipolar disorder) आहे, त्यांना ‘भूतबाधा’ किंवा ‘काळजबूत’ समजून फक्त बाबांकडे नेले जाते. यामुळे वैद्यकीय उपचार उशिरा मिळतात आणि आजार बळावतो. भारतात अजूनही अनेक ठिकाणी मानसिक आजारांसाठी faith healing पहिली पसंती असते. निराशा आणि ट्रॉमा जेव्हा ‘चमत्कार’ होत नाही, तेव्हा भक्तांमध्ये गहन निराशा, विश्वासघाताची भावना, depression आणि anxiety वाढू शकते. काही अभ्यासांनुसार godmen च्या प्रभावाखाली असलेल्या लोकांमध्ये long-term trust issues, decision-making ची कमजोरी आणि spiritual trauma दिसतो. सामुदायिक आणि सार्वजनिक प्रभाव जेव्हा उच्च पदावरील व्यक्ती (जसे माजी सरन्यायाधीश) राष्ट्रपती, प्रधानमंत्री, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री हे अशा ‘चमत्कार’ दाखवणाऱ्या व्यक्तींच्या भेटी घेतात, तेव्हा सामान्य लोकांसाठी प्रतिकात्मक संदेश जातो की ‘हे योग्य आणि प्रभावी आहे’. यामुळे विज्ञान-आधारित उपचारांऐवजी अंधश्रद्धेकडे वळण्याचे प्रमाण वाढू शकते. विशेषतः ग्रामीण भागात आणि कमी शिक्षित वर्गात हे धोकादायक ठरू शकते. मन वाचण्याच्या युक्त्या बागेश्वर बाबांच्या ‘मन वाचणे’ सारख्या गोष्टी बहुतेकदा cold reading, pre-arranged information किंवा psychological tricks वर आधारित असतात. हे पाहणाऱ्या लोकांमध्ये सुरुवातीला आश्चर्य वाटते, पण नंतर disillusionment येऊ शकते, ज्यामुळे स्वतःच्या निर्णयक्षमतेवर अविश्वास निर्माण होतो.

**मन:स्वास्थ्याचा प्रवास**



प्रवीण गांगुर्डे
मो. 9890631933

**संतुलित दृष्टिकोन काय असावा? :-** मानसिक आरोग्य तज्ज्ञांच्या मते, श्रद्धा आणि विज्ञान यांच्यातील संघर्ष नको. दोन्ही एकमेकांना पूरक असू शकतात. सकारात्मक श्रद्धा - समुदायाची भावना, आशा, नैतिक मूल्ये आणि तणाव व्यवस्थापनात मदत करते.

**अंधश्रद्धा :-** जेव्हा ‘चमत्कार’ किंवा ‘दिव्य शक्ती’ चा दावा केला जातो आणि त्यासाठी पुरावा नाकारला जातो, तेव्हा ती मानसिक आरोग्यासाठी धोकादायक ठरते. भारतात मानसिक आरोग्य सेवा अजूनही अपुऱ्या आहेत (एक psychiatrist प्रति लाखो लोक). त्यामुळे faith healers नैसर्गिकरित्या भरून काढतात. पण आदर्श स्थिती ही आहे की faith healing सपोर्टिव्ह भूमिका बजावावी, मुख्य उपचार नव्हे. उदाहरणार्थ, बाबा सामाजिक कार्य (गुरुकुल, शिक्षण, आरोग्य केंद्र) करत असतील तर ते चांगले, पण ‘चमत्कार’ चा दावा केला तर तो तपासावा. प्रा. श्याम मानव यांच्या समितीचे आव्हान (30 लाख किंवा 80 लाखोचे हे पुरावा-आधारित विचारसरणीला प्रोत्साहन देते. ते मानसिक आरोग्याच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे, कारण ते लोकांना critical thinking शिकवते - ‘मी का विश्वास ठेवतो?’ हा प्रश्न स्वतःला विचारणे हे स्वस्थ मनाचे लक्षण आहे. बागेश्वर बाबांच्या भेटीचा वाद केवळ ‘वैयक्तिक श्रद्धा’ किंवा ‘अंधश्रद्धा’चा नाही. तो मानसिक आरोग्याच्या सीमारेषेवर उभा आहे. श्रद्धा लाखो लोकांना सांत्वन देते, पण जेव्हा ती पुरावा-विरोधी होते आणि वैद्यकीय मदतीला अडथळा करते, तेव्हा ती हानिकारक ठरते. त्यामुळे अशी श्रद्धा नाकारली पाहिजे. समाज म्हणून आपल्याला हवे ते संतुलन :- व्यक्तिगत श्रद्धेचा आदर करा. पण ‘चमत्कारा’ च्या दाव्यांना पुरावा मागण्याचा अधिकार राखा. मानसिक आजारांसाठी वैज्ञानिक उपचार (therapy, medication) डॉक्टर, मनोविकारतज्ञ, मानसोपचारतज्ञ, मानसोपचार सामाजिक अधिक्षक, मानसशाश्रज्ञ, समुपदेशक, मानसिक आरोग्य व्यावसायिक यांना प्रोत्साहन द्या. faith healing ला पूरक म्हणून वापरा, पर्याय म्हणून नव्हे. शेवटी, खरा ‘चमत्कार’ हा मेंदू समजून घेणे, तणाव व्यवस्थापित करणे आणि पुरावा-आधारित निर्णय घेणे यात आहे. आपल्या मानसिक आरोग्याची जबाबदारी बाहेरच्या कोणत्याही बुआ, बाबा, मांत्रिक तांत्रिक तथाकथित कुठल्याच ‘बाबा’ वर सोपवू नका - स्वतःकडे घ्या, विज्ञान आणि तर्क यांना साथ द्या. बुद्धिप्रामण्यवादी बना म्हणजे मानसिक आजारांपासून दूर राहाल आणि बाबा लोकांपासून फसवणूक होण्यापासून वाचाल. आपणास विवेकी व्यक्ती बनण्यास शुभेच्छा. ■ ■

“ विश्वास ही मोठी ताकद आहे,
ती अशक्य गोष्टही शक्य करते... ”

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची ग्रामगीता राज्याला शिकविण्याची गरज...



नाशिकच्या ढोंगी बाबा अशोक खरात, राजेंद्र गडगे, महेश गिरी सारख्या अनेक पाखंडी ढोंगी बुवा-बाबांनी मंत्रतंत्राने आजार बरे करणे, लग्नातील अडथळे दूर करणे. करणी, भूतबाधा आणि भरभराटीच्या नावाखाली महिलांच्या लैंगिक शोषणाने थैमान घालून महाराष्ट्र नासवला असल्याने पुरोगामी टिकविण्यासाठी महाराष्ट्रात अंधश्रद्धा निर्मूलनाचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. 30 एप्रिल रोजी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची 117 वी जयंती असल्याने अंधश्रद्धा राज्याला त्यांची ग्रामगीता शिकविण्याची खरी गरज आहे. कारण राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हे एक थोर समाजसुधारक, कवी आणि अंधश्रद्धा विरोधी संत होते. आयुष्यभर समाजातील अनिष्ट रुढी, परंपरा, अंधश्रद्धा आणि जातिभेदाच्या विरोधात लढा दिला. आपल्या भजनातून दांभिकपणा, बुवाबाजी आणि अंधश्रद्धेवर कडाडून टीका करत होते. त्यांनी अंधश्रद्धा, अस्पृश्यता, बळी प्रथा, व्यसनाधीनता आणि जातीभेद यांसारख्या सामाजिक अनिष्ट प्रथाविरुद्ध सतत आवाज उठवला. अंधश्रद्धेमुळे समाजाला जडलेला कर्करोग, तो नष्ट करण्यासाठी त्यांनी ग्रामगीतेतून विचार मांडले.

तुकडोजी महाराज यांचा वैज्ञानिक दृष्टिकोन : अंधश्रद्धेऐवजी माणुसकी आणि विवेकवादाचा पुरस्कार करणारा होता. अध्यात्मिक, सामाजिक, राजकीय क्षेत्रात महान कार्य करीत असताना तुकडोजी महाराज म्हणत की, ‘जातीपंथ अता विसरुनिया जाऊ, नंदादीप उजळूया मानवधर्माचे’ त्यांनी 1941 मध्ये सत्याग्रह नावाचे वैयक्तिक नागरी प्रतिकाराचे कार्य सुरू केले. 1942 च्या ‘भारत छोडो आंदोलनात’ त्यांना अटक करून नागपूर व रायपूर मध्यवर्ती कारागृहात कैद करण्यात आले होते. आचार्य विनोबा भावे यांच्या भूदान आणि जमीन सुधारणा चळवळीत भाग घेतला. 1945 चा बंगाल दुष्काळ 1962 चे भारत-चीन युद्ध आणि 1967 च्या कोयना भूकंपाच्यावेळी समाज प्रबोधन कार्यातून निधी उपलब्ध करून मदतकार्य केले. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर, त्यांनी ग्रामीण पुनर्रचना केली. जपानमध्ये झालेल्या 1955 मध्ये जागतिक धर्म आणि जागतिक शांतता परिषदेला हजेरी लावली. म्हणून भारताचे पहिले राष्ट्रपती राजेंद्र प्रसाद यांनी तुकडोजी महाराजांना ‘राष्ट्रसंत’ ही पदवी प्रदान केली. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचा ‘ग्रामगीता’ हा केवळ ग्रंथ नसून ग्रामविकासाचा व वैचारिक प्रबोधनाचा आधारस्तंभ आहे. यात ग्रामीण भागातील अंधश्रद्धा, अनिष्ट प्रथा आणि जातिभेदावर प्रखर प्रहार करते. खरा देव खेड्यातील कष्टाळू मानवात असल्याचे सांगून वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवण्याचा आणि सुखी-समृद्ध गाव निर्माण करण्याचा संदेश दिला आहे. ग्रामगीतेनुसार देव देवळात नसून तो श्रमी लोकांच्या रूपात जनात आहे. ‘मानवसेवा हीच ईश्वरसेवा’ हा विचार मांडून त्यांनी कर्मकांड आणि अंधश्रद्धेवर मात केली. ग्रामगीतेतील ‘दृष्टी परिवर्तन’ आणि ‘संस्कार शोधन’ अध्यायातून ग्रामीण जीवनात विवेकवादाचा (विवेक बुद्धी) वापर करण्यावर भर दिला आहे. समाजाला अज्ञानी आणि परावलंबी बनवणाऱ्या अंधश्रद्धांवर टीका करत, त्यांनी भजनांच्या व कीर्तनांच्या माध्यमातून प्रबोधन केले. ‘आंधळ्या समजुती सोडा’ असे आवाहन त्यांनी केले. महिला उन्नती व आरोग्य महिलांचे अज्ञान दूर करून त्यांना आत्मसन्मानाने जगण्याची प्रेरणा दिली. गावातील जातभेद मिटवून समता प्रस्थापित करणे आणि सामूहिक श्रमातून गाव समृद्ध करणे, हा ग्रामगीतेचा मुख्य उद्देश आहे. आरोग्याच्या समस्या सोडवण्यासाठी अंधश्रद्धेऐवजी स्वच्छतेला आणि शास्त्रीय ज्ञानाला प्राधान्य देण्यास सांगितले. राष्ट्रसंतांनी खंजिरी भजनाच्या माध्यमातून ग्रामगीतेचे विचार पोहोचवले, ज्यामुळे ग्रामीण भागात मानसिक आणि सामाजिक क्रांती घडून येण्यास मोठी मदत झाली. ■ ■



आनंद म्हस्के
मो. 8652325032

# समतावादी चळवळ पुढे जाणार नाही!

## वर्गिकरणाला विरोध केल्याने फुले-आंबेडकरांची



एखाद्या विषयाचे समर्थन किंवा विरोध करण्याचा प्रत्येकाला अधिकार आहे, तो कर्तव्य किंवा जबाबदारी म्हणून प्रत्येकांनी पार पाडला पाहिजे. आरक्षण उपवर्गिकरणासाठी आवश्यक असलेला इम्पेरिकल डाटा म्हणजे अनुभवजन्य माहितीचा विषय, गेली 18 महिने न्या. अनंत बदर समिती यावर काम करीत होती. सरकारची यंत्रणा वापरून या समितीने आवश्यक असलेला डाटा गोळा केला असेल. डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे यांनी देखील या विषयाच्या अनुषंगाने एक अहवाल सादर केलेला आहे. याच विषयासाठी नेमलेला लहुजी साळवे अभ्यास आयोग होता, या आयोगाचा अहवाल 2008 साली तत्कालीन सरकारकडे दाखल करण्यात आलेला आहे. सदर अहवालामध्ये वर्गीकरणाच्या अनुषंगाने आवश्यक असलेला अभ्यास आहे. या विषयाचा ज्यांना अभ्यास नाही किंवा वर्गीकरण हा विषय तोडण्याचे षडयंत्र आहे असे ज्यांना वाटते, त्यांना जे मागे राहिले, कमजोर आहेत, सशक्त घोड्यांच्या स्पर्धेत टिकू शकत नाहीत, अशा अशक्त घोड्यांना इतरांच्या बरोबरीने आणण्यासाठी खास/विशेष संरक्षण दिले पाहिजे, असे मुळीच वाटत नाही, कारण विरोध करणाऱ्यांकडे छ. शाहु महाराज यांचा दृष्टिकोन समजण्यासाठी न्याय्यदृष्टी आवश्यक असते, त्याचा अभाव आहे. पंजाब राज्यात 1975 ला अ आणि ब अशा दोन गटात तेथील ग्यानी झेलसिंग यानी वर्गीकरण करून लाभवंचित राहणाऱ्या समूहाला आरक्षणाचा अधिकार प्राप्त करून देण्यासाठी संरक्षण दिले होते. याबाबतीत काही कालावधीनंतर सर्वे केल्यावर असे लक्षात आले की जो लाभवंचित समूह आहे, त्यांच्यात आरक्षण लाभाचे चित्र समाधानकारक दिसून आले. तेलंगणा, आंध्रप्रदेश, हरियाणा, कर्नाटक या राज्यात वर्गीकरणाची जी प्रक्रिया राबविण्यात आली त्याचा अवलंब केला जात असेल तर आपण त्यात सहभागी झाले पाहिजे. न्यायाच्या प्रतिक्षेत असलेल्या समूहाला संविधानिक हक्क प्रधान करण्यासाठी पुढे आले पाहिजे. हे काम फुले-आंबेडकरांच्या स्वप्नपुर्तीसाठी अनिवार्य आहे. ज्यांचा विवेक जागा असेल, ज्यांच्याकडे बंधुभाव, करूणा असेल, ते निश्चितच वर्गीकरणाचे स्वागत करतील. ते करीत आहेत. ■ ■

- डॉ. रामचंद्र भरांडे

# माय म्हणजे काय?

## अनंतायन



ॲड. अनंत खेळकर
मो. 9370061677

म्हातारी विधवा आई खेडेगावातील आपल्या घरी राहायची. तिचा एकुलता एक लेक नोकरीनिमित्त बाहेरगावी राहायचा. अजूनही त्याचा हवा तसा जम बसला नव्हता. म्हातारपण म्हटले की, प्रकृतीच्या कुरबुरी या राहणारच. तो आईची काळजी करायचा. आज तो आईच्या भेटीला आला. त्याने आईला औषधोपचारासाठी काही जास्त पैसे दिले. दुपारी तो सहज पहुडला असता त्याच्या कानावर आवाज आला. आवाजाच्या रोखाने त्याने कान टवकारले. आई शेजारच्या एका मुलीला म्हणत होती, ‘हे पैसे घे! शेजारच्या आजारी शेवंताकडून तिला डॉक्टरांनी लिहून दिलेली औषधी पोहचवून दे. अजून काही पैसे लागल्यास मला नक्की सांग. शेवंताला म्हणावे औषधांच्या बाबतीत मुळीच चालढकल करू नकोस.’ ती मुलगी निघून गेली. हा खोलीतून बाहेर आला अन् आईला म्हणाला, ‘आई! मला तुटपुंजा पगार आहे. मी माझ्या काही गरजांना बाजूला ठेवतो अन् तुला पैसे पुरवतो. मला तुझी काळजी वाटते. तू तुझ्या आजारासाठी पैसे न खर्च करता जो दानधर्म चालवलाय, तो मला परवडण्यासारखा नाही. का दिले तू तिला पैसे?’ त्यावर माय म्हणाली, ‘रागावू नको माझ्या लेकरा! अरे शेवंता विधवा आहे. लहानपणीच तिचे मायबाप देवाघरी गेले. आई आहे रे मी! म्हातारी झाली आता. पिकले पान कधी गळून पडेल काही नेम नाही. मी म्हातारी तर एकटीच आहे. पण शेवंता तरूण आहे अन् तिच्या पोटी तीन तीन लेकरे आहेत बाळा! औषधाविना जर शेवंताचे बरे वाईट झाले, तर त्या लेकरांचे काय होईल?’ तो म्हणाला, ‘चुकलो आई! क्षमा कर! आज तुझे विचार ऐकून मला कळले की कुणाला दुःखी, कष्टी बघून जर आपल्या काळजाला वेदना होत असतील तर निश्चितच परमेश्वराने आपल्याला मानव जन्म देऊन कोणतीही चूक केली नाही.’ ■ ■

# 1920 च्या माणगाव परिषदेचे ऐतिहासिक महत्त्व

माणगाव परिषद ही एक क्रांतीकारक घटना आहे. या परिषदेने खऱ्या अर्थाने डॉ. आंबेडकर यांना घडविणारी ऐतिहासिक कामगिरी केली. दि. 14 एप्रिल 2026 रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा 135 वी जयंती साजरी होणार आहे. त्या पार्श्वभूमीवर विचार केला तर असे आढळून येते की डॉ. बाबासाहेबांच्या जीवनातील अनेक महत्त्वाच्या घटनांपैकी माणगाव परिषद एक महत्त्वाची क्रांतीकारक घटना आहे. 21 व 22 मार्च 1920 रोजी कोल्हापूर संस्थानातील माणगाव येथे अखिल महाराष्ट्र अस्पृश्य वर्गाची परिषद झाली. त्या घटनेला 126 वर्ष होत आहेत. ही एक क्रांतीकारक घटना आहे. कारण या परिषदेने खऱ्या अर्थाने डॉ. आंबेडकर यांना घडविणारी ऐतिहासिक कामगिरी केली. त्यांनी पहिल्यांदाच एका मोठ्या सामाजिक-राजकीय व्यासपीठावरून उपेक्षितांचे नेतृत्व केले. त्यांच्या सार्वजनिक जीवनातील प्रवेशाच्या दृष्टीने ही परिषद अत्यंत महत्त्वाची ठरली. भारतीय सामाजिक परिवर्तनाच्या इतिहासात माणगाव परिषद ही एक अत्यंत निर्णायक घटना मानली जाते. कारण या परिषदेने बहिष्कृत समाजाच्या जीवनात नवा आत्मविश्वास निर्माण केला आणि सामाजिक न्यायाच्या चळवळीला स्पष्ट दिशा दिली. ही परिषद केवळ एक सभा नव्हती, तर ती नवजागरणाची सुरुवात होती. या परिषदेच्या पार्श्वभूमीला त्या काळातील सामाजिक परिस्थिती जबाबदार होती. अस्पृश्यतेच्या जोखडाखाली दबलेल्या समाजाला शिक्षण, पाणी, मंदिर प्रवेश, सार्वजनिक सुविधा या मूलभूत हक्कांपासून वंचित ठेवले जात होते. अशावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी या अन्यायाविरुद्ध संघटित लढा उभारण्याचा निर्णय घेतला आणि त्यातून माणगाव परिषदेचे आयोजन झाले. या परिषदेला समाजातील विविध स्तरांतील लोक मोठ्या संख्येने उपस्थित होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे या परिषदेचे प्रमुख नेतृत्व करीत होते, तर छत्रपती शाहू महाराज हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. याशिवाय अनेक सामाजिक कार्यकर्ते, स्थानिक नेते, शिक्षणप्रेमी व्यक्ती, तसेच ग्रामीण भागातील हजारो बहिष्कृत नागरिक या परिषदेत सहभागी झाले. विशेष म्हणजे महिलांचाही सहभाग या परिषदेत दिसून आला, ज्यामुळे ही चळवळ सर्वसमावेशक बनली. राजर्षी शाहू महाराजांची ऐतिहासिक भविष्यवाणी या परिषदेत केली. शाहू महाराजांनी डॉ. आंबेडकरांच्या विद्वत्तेचे आणि नेतृत्वाचे कौतुक करताना एक महत्त्वपूर्ण विधान केले होते :- ‘तुम्हाला तुमचा खरा नेता मिळाला आहे. ते फक्त तुमचेच नव्हे, तर संपूर्ण भारताचे नेते होतील’. ही भविष्यवाणी पुढे खरी ठरली. त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, ‘डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे तुमचे खरे पुढारी आहेत.’ या विधानाने डॉ. बाबासाहेबांच्या नेतृत्वाला सार्वजनिक मान्यता मिळाली. शाहू महाराजांनी जातिभेदाचा तीव्र निषेध करत सर्व माणसे समान असल्याचा संदेश दिला. त्यांनी शिक्षणाला प्रगतीचे मुख्य साधन मानले आणि अन्यायाविरुद्ध उभे राहण्याचे आवाहन केले. याच परिषदेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेले भाषण बहिष्कृत समाजाच्या इतिहासात मैलाचा दगड ठरले. त्यांच्या भाषणात त्यांनी सर्वप्रथम समाजाला त्यांच्या गुलामगिरीची जाणीव करून दिली. त्यांनी स्पष्ट सांगितले की, ही स्थिती नशिबामुळे नसून अन्यायकारक सामाजिक व्यवस्थेमुळे आहे. त्यामुळे अन्याय सहन करणे थांबवले पाहिजे, असे त्यांनी ठामपणे मांडले.



डॉ. बाबासाहेबांनी शिक्षणाला अत्यंत महत्त्व दिले. ‘शिक्षणाशिवाय उद्धार नाही’ हा त्यांचा ठाम संदेश होता. आपल्या अध्यक्षीय भाषणात डॉ. आंबेडकरांनी शिक्षणावर विशेष भर दिला. ‘उपाशी राहा, मरा, परंतु आपल्या मुलांना शिकवा,’ असे आवाहन त्यांनी समाजाला केले. शिक्षणाशिवाय दलित समाजाची प्रगती होणे अशक्य आहे, हा विचार त्यांनी या परिषदेत मांडला. त्यांनी लोकांना शिक्षण घेण्याचे आवाहन केले, कारण अज्ञान हेच गुलामगिरीचे मूळ आहे, असे ते मानत होते. त्याचबरोबर त्यांनी स्वाभिमान आणि आत्मसन्मान जागवण्यावर भर दिला. ‘आपणही माणूस आहोत, आपल्यालाही समान हक्क आहेत,’ ही भावना त्यांनी समाजात रुजवली. संघटन आणि एकजूट यावरही डॉ. बाबासाहेबांनी विशेष भर दिला. विखुरलेला समाज कधीच सक्षम होऊ शकत नाही, त्यामुळे एकत्र येणे आणि सामूहिक शक्ती निर्माण करणे आवश्यक आहे, असे त्यांनी सांगितले. त्यांनी लोकांना हक्क मिळवण्यासाठी संघर्ष करण्याची प्रेरणा दिली. ‘हक्क मिळवावे लागतात, कोणी देत नाही,’ हा त्यांचा संदेश पुढील सर्व चळवळींचा आधार ठरला. माणगाव परिषद ही पुढील सामाजिक चळवळींची बीजे रोवणारी ठरली. याच विचारांचा पुढे महाड चवदार तळे सत्याग्रह, मंदिर प्रवेश आंदोलन आणि इतर लढ्यांमध्ये विस्तार झाला. या परिषदेने बहिष्कृत समाजात राजकीय आणि सामाजिक जागृती निर्माण केली, ज्यामुळे पुढील काळात त्यांनी आपल्या हक्कांसाठी संघटितपणे संघर्ष केला. ही परिषद केवळ एका जातीपुरती मर्यादित नव्हती, तर सर्व वंचित आणि उपेक्षित जाती-जमातींना एकत्र आणण्याचा तो एक प्रयत्न होता. अस्पृश्यता नष्ट करणे आणि सामाजिक समता प्रस्थापित करणे हे या परिषदेचे मुख्य उद्दिष्ट होते. अशा प्रकारे माणगाव परिषद ही बहिष्कृत समाजाच्या इतिहासातील एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली आणि छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रेरणादायी विचारांमुळे या परिषदेने सामाजिक परिवर्तनाचा मार्ग प्रशस्त केला. ही परिषद खऱ्या अर्थाने ‘मूकनायक’ आणि पुढील चळवळीची नांदी ठरली या परिषदेच्या काही काळ आधीच डॉ. आंबेडकरांनी ‘मूकनायक’ हे पाक्षिक सुरू केले होते. परिषदेनंतर समाजातील जागृती अधिक वाढली आणि पुढे ‘बहिष्कृत हितकारिणी सभा’ सारख्या संस्थांच्या माध्यमातून संघटित चळवळ उभी राहण्यास मदत झाली. उपरोक्त ऐतिहासिक बाबींमुळे माणगाव परिषद ही स्वाभिमान, शिक्षण, संघटन आणि संघर्ष यांची घोषणा होती. आजही सामाजिक न्याय आणि समतेसाठी लढताना या परिषदेची प्रेरणा अत्यंत मोलाची ठरते. ■ ■



प्रा. संध्या वैद्य
मो. 9029219634

# अनुसूचित जाती जनगणनेत धर्मांतरित बौद्धांसाठी स्वतंत्र

2011 ला झालेल्या भारतीय जनगणनेनंतर पुढील मे 2026 पासून जनगणना करण्याचा निर्णय भारतीय सरकारने घेतला आहे. विविध प्रकारची माहिती प्रस्तावित जनगणनेतून जनहिताच्या योजना राबविण्याकरीता त्यांच्या कल्याणार्थ सरकार गोळा करणार आहे. त्या माहितीपैकी कौटुंबिक माहिती व त्याचबरोबर नागरिकांचा धर्म व जात यांचीही माहिती जनगणनेच्या माध्यमातून सरकार गोळा करणार आहे. आमच्या असे निदर्शनास आले की, यापूर्वी झालेल्या (2011) जनगणनेत बौद्ध धर्मियांच्या बाबतीत जनगणना फॉर्ममध्ये त्यांची लोकसंख्या जाणून घेण्याकरीता योग्य कॉलम/रकाना नसल्यामुळे भारतातील बौद्धांची खरी लोकसंख्या दर्शविण्यात आलेली नाही. या देशातील शोषित, पिडीत, दलित, वंचित जनसमूहाला त्यांचे मूलभुत हक्क व मानविय अधिकार, स्वांतत्र्य व समता प्राप्त करून देण्यासाठी आणि जातीमुक्त समाज निर्माण होण्याच्या उद्देशाने 14 ऑक्टोबर 1956 ला लाखो लोकांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वात बौद्ध धम्माची दिक्षा घेऊन हिंदू धर्म सोडून बौद्ध धम्माचा स्विकार केला. भारतीय संविधानाने अनुच्छेद 25 नुसार प्रत्येक नागरिकाला धर्म स्वातंत्र्याचा अधिकार दिला आहे. महाराष्ट्र शासनाने 6 जुलै 1960 च्या परिपत्रकान्वये अनुसूचित जातीतून धर्मांतरीत बौद्धांना अनुसूचित जातीचे आरक्षण व सवलती लागू केल्या आहेत. मात्र केंद्र शासनाने धर्मांतरीत बौद्धांना अनुसूचित जातीचे आरक्षण व सवलती लागू केल्या नाहीत. त्यामुळे लाखो धर्मांतरीत बौद्धांना केंद्र शासनाच्या नोकरी, शिक्षण, संसद, विधीमंडळ इत्यादीमध्ये अनुसूचित जातीला मिळणाऱ्या सवलतीपासून वंचित राहावे लागले व त्यांचे केंद्रशासनातील नोकऱ्यांमध्ये व शैक्षणिक सवलती व विधिमंडळामध्ये योग्य प्रतिनिधीत्व न मिळाल्यामुळे प्रचंड नुकसान झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना जातीमुक्त भारत देश करावयाचा होता. अस्पृश्यतेचे व जातीयतेचे चटके यांच्या दाहक अनुभवातून त्यांनी स्वतःही बौद्ध धम्माची (धर्माची) दिक्षा घेतली व लाखो लोकांना बौद्ध धम्माची (धर्माची) दिक्षा दिली. डॉ. बाबासाहेबांना संपूर्ण देश बौद्धमय करावयाचा होता. परंतू त्यांच्या अकाली महापरिनिर्वाणामुळे त्यांचे ते स्वप्न अपूर्ण राहिले. ज्या लाखो लोकांनी बौद्ध धम्माची दिक्षा घेतली त्यापैकी अनेक लोक आपला धर्म बौद्ध असून जात महार असल्यामुळे नोंदवतात ही अतिशय गंभीर बाब आहे. बौद्ध धर्मात जातीला स्थान नसून त्यात जात नाहीच. परंतू आपणाला अनुसूचित जातीच्या सवलती व अधिकार मिळणार नाहीत या अनाकलनीय भितीमुळे अनेक तथाकथित बौद्ध महार जातीला अजूनही मुंगळ्यासारखे चिटकून आहेत. या बाबीचा गांभिर्याने विचार होणे गरजेचे आहे. डॉ. बाबासाहेबांचे बौद्धमय भारताचे स्वप्न पूर्ण करण्याची जबाबदारी धर्मांतरीत बौद्धांची आहे. त्यांनी ती प्रामाणिकपणे व एक खरा बौद्ध म्हणून पार पाडवयास पाहीजे. महार जातीचा उल्लेख न करता केवळ आपण धर्मांतरीत बौद्ध आहोत असा उल्लेख केल्यास कोणत्याही सवलती, अधिकारापासून आपणांस वंचित ठेवल्या जाऊ शकत नाहीत. 1990 मध्ये केंद्र शासनाने अनुसूचित जातीतून धर्मांतरीत बौद्धांना आरक्षणाच्या सवलती प्राप्त होतील असे ज्ञापन निर्गमित केले आहे. त्याचा उल्लेख वर आलेला आहे. परंतू मुख्य अडचण ही आहे की, केंद्र शासनाने अनुसूचित जातीच्या यादीमध्ये अनुसूचित जातीतून धर्मांतरीत बौद्ध असा उल्लेख न केल्यामुळे धर्मांतरीत बौद्धांना आरक्षणाची सवलत, अधिकारापासून वंचित राहावे लागते. या करीता धर्मांतरीत बौद्धांनी 1990 च्या केंद्र शासनाच्या ज्ञापनाचा आधार घेऊन केंद्र शासनाला केंद्राच्या अनुसूचित जातीच्या यादीत धर्मांतरित बौद्ध यांचा समावेश करण्यास बाध्य करावे, काही संघटनांनी तसा प्रयत्न केलेला आहे. परंतू केंद्र शासनाने त्याची अद्याप दखल घेतलेली दिसत नाही. त्यामुळे सर्व स्तरातून, संघटनांनी त्याचा पाठपुरावा करून केंद्र शासनावर दबाव निर्माण करावयास पाहिजे. याशिवाय सुरु असलेल्या जनगणनेत, जनगणनेच्या फॉर्ममध्ये बौद्धांनी आपला धर्म बौद्ध लिहून जातीच्या रकान्यात नाही किंवा निरंक असे लिहावे व डॉ. बाबासाहेबांच्या बौद्धमय भारताचे स्वप्न तडीस नेण्याचा प्रयत्न करावा.



संविधानातील अनुच्छेद 341 (1) (2) नुसार राष्ट्रपती किंवा राज्यपाल यांना संविधानाच्या प्रयोजनार्थ अनुसूचित जाती म्हणून मानल्या जातील, त्या जाती वंश किंवा जनजाती अथवा जाती, वंश किंवा जनजाती यांचे भाग किंवा त्यातील गट विनिर्दिष्ट करता येतील व संसदेला काय द्वारे कोणतीही जात, वंश किंवा जनजाती अथवा कोणतीही जात, वंश किंवा जनजाती यांचा भाग किंवा त्यातील गट खंड अधिसूचनेत विनिर्दिष्ट केलेल्या अनुसूचित जातीच्या सूचित समाविष्ट करता येतील. अनुच्छेद 366 (24) मध्ये अनुसूचित जातीची व्याख्या आहे. त्यानुसार संविधनाच्या प्रयोजनार्थ अनुच्छेद 341 खाली अनुसूचित जाती असल्याचे मानले गेले आहे. अशा जाती, वंश किंवा जनजाती अथवा जातीचे, वंशाचे किंवा जनजातीचे भाग अथवा त्यातील गट असा आहे. या व्याख्येनुसार महार जातीतील धर्मांतरीत बौद्ध हा महार वंशातील एक भाग आहे. एक गट आहे व तो धर्मांतरीत बौद्धांना लागू पडतो. मा. व्ही. पी. सिंग यांच्या कार्यकाळात संविधान (अनुसूचित जाती) आदेश (संशोधन) विधियेक, 1990 पारित झाले. या विधियेकानुसार संविधान (अनुसूचित जाती) आदेश 1950 व संविधान (अनुसूचित जाती) (संघ व राज्य क्षेत्र) आदेश 1951 ला संशोधित करण्यात आले. त्यानुसार संविधान (अनुसूचित जाती) यामधील शिख शब्दाऐवजी शीख व बौद्ध या शब्दांना टाकण्यात आले. मिनिस्ट्री ऑफ वेलफेयर/कल्याण मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी त्यांचे ज्ञापन क्र. 12016/28/90-एस सी डी/(आर सेल) दि. 20/11/1990 नुसार अनुसूचित जातीतून धर्मांतरीत बौद्धांना अनुसूचित जातीचे सदस्य समजल्या जातील असा व धर्मांतरीत बौद्धांना आरक्षणाच्या सवलती प्राप्त होणार असे ज्ञापन निर्गमित केले आहे. परंतू केंद्र शासनाने अनुसूचित जातीच्या यादीमध्ये अनुसूचित जातीतून धर्मांतरीत बौद्ध असा वेगळा किंवा स्वतंत्र उल्लेख आजपर्यंत न केल्यामुळे धर्मांतरीत बौद्धांना केंद्र शासनाच्या अनुसूचित जातीच्या सवलती, अधिकार प्राप्त होऊ शकल्या नाहीत. त्याचप्रमाणे जनगणनेच्या फॉर्ममध्ये अनुसूचित जातीतून धर्मांतरीन बौद्ध असा कॉलम/रकाना नसल्यामुळे बौद्धांची जनगणना होऊ शकली नाही. संविधानाच्या अनुच्छेद 341 व 366 (24) नुसार धर्मांतरीत बौद्ध हा महार या अनुसूचित जातीतील वेगळा भाग व गट असल्यामुळे त्यांची जनगणना होणे अत्यावश्यक आहे. त्यामुळे भारतात बौद्धांची खरी लोकसंख्या किती आहे ते कळेल व केंद्र शासनाला देखील त्यांच्या विकास व उन्मतीकरिता योग्य व आवश्यक उपाय-योजना आखणे सोपे जाईल. यास्तव होऊ घातलेल्या भारतीय जनगणनेत, जनगणनेच्या कौटूंबिक माहिती गोळा करण्याच्या फॉर्म मध्ये अनुसूचित जातीतून धर्मांतरीत बौद्ध असा कॉलम / रकाना समाविष्ट करण्यात यावा. ■ ■

ॲड. एम. एन. चोखांद्रे
मो.9423126405

# सरकार : ठेकेदारांचे हितचिंतक की...?



अलिकडेच महाराष्ट्र राज्य महामंडळाच्या ‘शिवाई’ बसने नागपूर ते चंद्रपूर प्रवास केला. आता ऊन तापू लागले तेंव्हा दुपारनंतर प्रवास करण्यापेक्षा सकाळीच प्रवास करण्याचा बेत केला. घरून लवकर निघालो. नरेंद्र नगर ते छत्रपती बस थांबा फार अंतर नाही. अगदी हॉटेल रेडिसन्सच्या पुढे मुख्य मार्गावर. घरून पायी निघाले तरी पोहचता येते. तरीपण अधिक उशीर नको म्हणून टॅक्सीने निघालो तर लगेचच नागपूर ते राजुरा ‘शिवाई’ मिळाली. ‘शिवाई’ महामंडळाची बस, पण ठेकेपद्धतींने चालविल्या जाते असे ऐकले होते. वाहनाने प्रवास करतांना याबाबत सत्यता पटली. शिवाई, 45 आसन व्यवस्था असलेली. जेव्हा गणेशपेठ स्थानकावरून बस सुटली तेव्हा छत्रपती स्थानकापर्यंत रिकामी म्हणजे एकही प्रवासी नव्हता. छत्रपती बस थांबावरून माझ्यासह अकरा प्रवासी, पाच महिला आणि सहा पुरुष, त्यात शासन धोरणाप्रमाणे महिलांना अर्ध तिकीट. सहा पुरुषापैकी तीन पुरुष अर्ध तिकीट म्हणजे केवळ तीन पुरुषाकडून पूर्ण तिकीट. तें तीनही पुरुष शेवटच्या टप्प्या पर्यंत न्हवते कुणी वरोरा तर कुणी भद्रावती पर्यंत. जाम पर्यंत तेवढ्याच प्रवाश्यासह बस आली. जामवरून दोन प्रवाशी बस मध्ये चढले, एक पुरुष व एक महिला दोघेही पंचांहत्तर वर्षावरील म्हणजे दोघेही मोफत प्रवास करणारे. ते दोघेही वरोराला उतरले. वरोराला मात्र बऱ्यापैकी प्रवाशी चढले काही शेवटच्या टप्प्या पर्यंतचे. शिवाई बसचे भाडे इतर बस पेक्षा सर्वात महागडे म्हणजे चंद्रपूर पर्यंत 434/- रुपये भाडे. तसे खाजगी बसचे चे 300/- रुपये भाडे. कदाचित याही कारणाने प्रवाशी शिवाई कडे आकर्षित होत नसावेत. आणखी विशेष सांगायचे म्हणजे एसटी बसची वेग मर्यादा मंडळाने निर्धारित केलेली, 80 ते 90 कि. मी. पेक्षा जास्त वेगाने चालविता येणार नाही. याशिवाय आणखी बंधने म्हणजे बस चा हॉर्न कर्कष नसावा, दोन हेड लाईट पेक्षा जास्त लाईट नसावेत, वगैरे.. वैगेरे.. सरकारने ही बंधने खाजगी वाहनाना बंधनकारक केलेली नाहीत, हे मात्र नवलंच! उदाहरणदाखल सांगायचे झाल्यास, खाजगी बस वायू वेगाने धावताना दिसतात. त्यांना प्रेशर हॉर्न वाजवीण्यास, दोन पेक्षा जास्त लाईट लावण्यास बंधने नाहीत. सरकारने त्यास सूट दिलेली आहे. या वाहनांना दोन-दोन चार हेडलाईट शिवाय या दोन हेडलाईटच्या मध्ये दोन मोठे हऱ्यॅलोजनंचे प्रखर लाईट. असे ऐकूण सहा हेड लाईट. म्हणजे रात्री सुद्धा या प्रखर प्रकाश्यात वेगाने वाहन नेता येईल व निर्धारित वेळेवर वा वेळेपूर्वीच वाहन ठराविक स्थळी पोहोचेल. शासन कसे परोपकारी आहे हे खाजगी वाहनाप्रती दाखविलेल्या निरागस प्रेमावरून दिसून येते. आता ठेकेदार पद्धत म्हणजे काय तर बस महामंडळाची ती एखाद्या ठेकेदाराला चालवायला द्यायची म्हणजे ड्रायव्हर ठेकेदारचा (ज्याचा पगार पंधरा ते विस हजार पर्यंत.) आणि कंडक्टर शासनाचा ( ज्याचा पगार किमान पन्नास हजार रुपये.)बस देखभाल दुरुती ठेकेदारकडे. ठेकेदाराला कि. मि. प्रमाणे भाडे द्यायचे. सध्याचा दर अंदाजे 65 ते 70 रुपये आहे. बस प्रति दिवस जेवढे कि. मि..चालेल त्या प्रमाणे भाडे द्यायचे. म्हणजे. समजा नागपूर - चंद्रपूर जाणे.. येणे 300 कि. मि. अंतर आहे, गृहीत धरूया 70/- रुपये प्रति कि. मि. भाडे आहे. तर 300 म 70= 21000/- येवढे भाडे ठेकेदाराला ध्यावे लागणार. प्रवाश्यांची संख्या लक्ष्यात घेता या पेक्षा जास्त उत्पन्न होत नाहीं. आता समजूया चंद्रपूर नागपूर जाणे येणे उत्पन्न झाले दहा हजार आणि देणे आहे एकेवीस हजार, म्हणजे अकरा हजार रुपये मंडळाला आपल्या खिश्यातून ध्यावे लागणार. हे आहे राज्यकर्त्यांचे अर्थशास्त्र, ज्यांनी हे ठरविले. हे अर्थशास्त्र लक्ष्यात घेता, ठेकेदाराच्या नावाखाली मंत्र्याचे नातेवाईक, त्यांचे हितचिंतक, त्यांचे संबंधित इतर कुणी यात गुंतले नसतील कश्यावरून? बस पूर्णत : प्रवाशासहींत नसली तरी आणि प्रवासात नफा मिळाला नसला तरी ठेकेदाराला ठरल्याप्रमाणे प्रति कि. मी. भाड्याप्रमाणे येणारी एकूण रक्कम ही त्याला द्यावीच लागणार. आता यात फायदा कुणाचा, ठेकेदाराचा की महामंडळाचा याचा विचार आम्ही नागरिकांनी (अंधभक्त सोडून) करायचा नाही काय? सध्या महामंडळाकडे पुरेसे कर्मचारी नाहीत. चालक /वाहक सेवानिवृत्त झालेत वा इतर कारणांनी सेवेतून कमी झालेत तर त्या जागेवर नेमणूक करण्यात येत नाही. त्यामुळे अधिकचा भार कार्यरत कर्मचाऱ्यावर पडत आहे. जसे त्यांना आठ तास ड्यूटी करायची आहे त्याची ड्यूटी संपली की त्याचे जागेवर दुसऱ्याची ड्यूटी लावली जाते पण कमी कर्मचारी असल्याने कधी कधी शक्य होत नाहीं अशावेळी एकाच कर्मचाऱ्यांस डबल ड्यूटी करावी लागते. तसे बंधनकारक नाही. ज्यास आवश्यक वाटते असेच कर्मचारी डबल ड्यूटी करतात मी प्रवास करीत असलेल्या, ‘शिवाई’ चा कंडक्टर डबल ड्यूटी करीत होता. म्हणजे त्याला सोळा तास ड्यूटी करावी लागणार होती. बरेचसे राज्यकर्ते ‘आपण जनसेवा करण्यासाठी राजकारणात आल्याचे सांगत असल्याचे वाचले आहे/ऐकले आहे. एसटी महामंडळासाठीचा सरकारने घेतलेला निर्णय, जनतेकरीता आहे की स्वतःचा स्वार्थी राजकीय हेतू साध्य करण्यासाठी आहे हे समजून. घ्यावे! हीच शिवाई’ बस जर ठेके पद्धतीने नसती तर ठरल्या प्रमाणे जी जादाची रक्कम द्यावी लागते ती वाचली असती, जरी तोटा झाला असला तरी इतक्या प्रमाणात झाला नसता. दुसरा मुद्दा असा की ठेकेदार ड्रायव्हरला पंधरा ते विस हजार पगार देतो आणि मंडळाचा कंडक्टर किमान पन्नास हजार घेतो पुढे याच ठराविक वेतनावर महामंडळ नियुक्ती करणार नाही कशावरून? आणि असे जर झाले तर ड्रायव्हर / कंडक्टर मिळून बस चालवतील, शेवटच्या टोकापर्यंत तिकीट काढल्या जाईल मध्ये उतरणारे / चढणारे प्रवाशांचे तिकिटाचे काय? ते मंडळाला मिळणार की ठेकेदाराला वा ड्रायव्हर / कंडक्टर च्या खिशात जाणार हा विचार करायला लावणारा प्रश्न आहे. एकंदरीत येणाऱ्या काळात महामंडळ पूर्णत : ठेकेदाराकडे सोपविल्या जाण्याची सुरवात तर नसावी! आणि ठकेदार तरी नेमका कोण हे अनुत्तारित राहणार! शेवटी तेही सरकार तसेच... हेही सरकार असेच... म्हणत आम्ही लोक आनंदाने टाळ्या वाजविणार! ■ ■

सुरेश रामटेके
मो. 9822361058

# दुहेरी संकटाच्या छायेत भारताची अर्थव्यवस्था

इतिहासात काही क्षण असे येतात, जेव्हा अनेक संकटे एकत्र येऊन परिस्थिती अधिक गंभीर बनवतात. भारत सध्या अशाच वळणावर उभा आहे. पश्चिम आशियातील संघर्ष, अल निनोमुळे कमकुवत होणारा मान्सून, घसरती औद्योगिक उत्पादनक्षमता आणि आंतरराष्ट्रीय गुंतवणुकीतील घट या सर्व घटकांनी मिळून अर्थव्यवस्थेला गुंतागुंतीच्या संकटात ढकलले आहे. फेब्रुवारी 2026 मध्ये अमेरिका आणि इस्रायलने इराणवर केलेल्या हल्ल्यांमुळे जागतिक ऊर्जा बाजारात मोठी अस्थिरता निर्माण झाली. होर्मुझ सामुद्रधुनीतून जाणाऱ्या तेलवाहतुकीत अडथळे आले, ज्याचा थेट परिणाम तेलाच्या किंमतींवर झाला. भारताच्या कच्च्या तेलाच्या गरजेपैकी सुमारे 85 टक्के आयात केली जाते, त्यामुळे या परिस्थितीचा मोठा फटका बसला. शिपिंग खर्च आणि विमा प्रिमियम वाढले, रुपया डॉलरच्या तुलनेत घसरला आणि शेअर बाजारातही मोठी घसरण झाली. या सर्वाचा परिणाम औद्योगिक उत्पादनावरही दिसून आला. मार्च 2026 मध्ये आठ प्रमुख उद्योगांच्या निर्देशांकात 0.4 टक्क्यांची घट झाली, जी दीर्घकाळातील सर्वात वाईट कामगिरी ठरली. खत उत्पादनात 24.6 टक्क्यांची मोठी घसरण झाली, तर कच्चे तेल, कोळसा आणि वीज उत्पादनातही घट दिसून आली. बांधकामाशी संबंधित पोलाद आणि सिमेंट उत्पादनातही मंदीचे संकेत मिळाले. युद्धाचा परिणाम केवळ ऊर्जा क्षेत्रापुरता मर्यादित नाही. पुरवठा साखळी विस्कळीत होणे, आयात खर्च वाढणे, वाहतूक खर्च वाढणे आणि आखाती देशांमधून येणाऱ्या परकीय चलनात घट होणे हे चार प्रमुख परिणाम आहेत. आखाती देश भारताच्या परकीय चलन प्राप्तीत मोठा वाटा उचलतात. त्यामुळे तिथली अस्थिरता भारतासाठी गंभीर ठरू शकते. आंतरराष्ट्रीय संस्थांनीही या परिस्थितीबाबत चिंता व्यक्त केली आहे. दीर्घकाळ संघर्ष चालू राहिल्यास भारताचा विकासदर कमी होण्याची आणि महागाई वाढण्याची शक्यता आहे. यामुळे रिझर्व्ह बँकेसमोर व्याजदराचे संतुलन राखण्याचे मोठे आव्हान उभे राहिले आहे. याच वेळी, मान्सूनची अनिश्चितता ही आणखी एक गंभीर चिंता आहे. 2026 साठी पावसाचे प्रमाण सरासरीपेक्षा कमी राहण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. अल निनोमुळे पावसात घट होण्याची शक्यता वाढली आहे. जरी सिंचनक्षेत्र वाढले असले तरी अजूनही मोठा शेती भाग मान्सूनवर अवलंबून आहे. कडधान्ये आणि तेलबिया यांसारख्या पिकांवर याचा मोठा परिणाम होऊ शकतो. युद्धामुळे खतांच्या किंमती वाढत असताना आणि मान्सून कमकुवत राहिल्यास उत्पादन घटण्याची शक्यता आहे. यामुळे शेतकऱ्यांवर दुहेरी ताण येतो, खर्च वाढतो आणि उत्पन्न कमी होते. ग्रामीण भागातील मागणी घटल्यास त्याचा परिणाम संपूर्ण अर्थव्यवस्थेवर होतो. सरकारसमोर या संकटावर उपाय करण्यासाठी काही पर्याय आहेत, परंतु प्रत्येक पर्यायाला मर्यादा आहेत. खत अनुदान वाढवणे किंवा इंधनावरील कर कमी करणे यामुळे तात्पुरता दिलासा मिळू शकतो, पण त्याचा परिणाम राजकोषीय तुटीवर होतो. त्यामुळे दीर्घकालीन उपाययोजना आवश्यक आहेत. तरीही काही सकारात्मक बाबीही आहेत. देशात अन्नधान्याचे उत्पादन विक्रमी झाले आहे आणि सरकारी साठेही पुरेसे आहेत. पोलाद आणि सिमेंट उत्पादनातील वाढ पायाभूत क्षेत्रातील स्थैर्य दर्शवते. परंतु हे सकारात्मक घटक एकूण संकटाची तीव्रता कमी करण्यास पुरेसे नाहीत. आगामी काळ अधिक महत्त्वाचा ठरणार आहे. खरीप हंगाम, जागतिक पुरवठा साखळी आणि पश्चिम आशियातील परिस्थिती या सर्वांचा एकत्रित परिणाम अर्थव्यवस्थेवर होणार आहे. जर ऊर्जा आणि खतांच्या किंमती उच्च राहिल्या, तर महागाई वाढण्याची शक्यता अधिक आहे. या पार्श्वभूमीवर सरकारला केवळ तात्पुरते उपाय न करता दीर्घकालीन नियोजन करणे गरजेचे आहे. पाणी व्यवस्थापन, खत साठवण, ग्रामीण रोजगार वाढवणे, अन्न वितरण सुधारणा आणि चलन स्थैर्य राखणे या सर्व गोष्टी महत्त्वाच्या ठरतात. ही परिस्थिती भारतासाठी एक मोठी परीक्षा आहे. अनुकूल परिस्थितीत मिळालेले यश टिकवण्यासाठी आता ठोस आणि दूरदृष्टी असलेले निर्णय घेणे आवश्यक आहे. संकट टाळता येणार नाही, परंतु त्याला सामोरे जाण्याची तयारी आणि धोरणात्मक क्षमता हीच खरी कसोटी ठरेल. ■ ■



विकास मेश्राम
मो. 7875592800

